- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर ▶ संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, ९ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २७० | किंमत : २ रूपये

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# गोंदिया-बालाघाट मार्गावर भीषण अपघात

## ट्रक-पिकअपच्या धडकेत ६ ठार, ७ गंभीर

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

गोंदिया-बालाघाट मार्गावरील नागरा-मोहरानटोली येथे ट्रक आणि पिकअप वाहनाची समोरासमोर धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात पिकअपमधील सहा जणांचा जागीच मृत्यू, तर सात जण जखमी झाले आहेत. अपघातातील सर्वजण मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील रहिवासी आहेत.



मजुरीच्या कामानिमित्त हैदराबादकडे निघालेल्या मजुरांच्या पिकअप वाहनाला नागरा-मोहरानटोली परिसरात पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील मजूर कामानिमित्त हैदराबादच्या दिशेने पिकअप वाहनातून जात होते. नागरा परिसरात त्यांच्या वाहनाला समोरून येणाऱ्या भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की पिकअप वाहनाचा मोठ्या प्रमाणात चुराडा झाला.

या अपघातात आरुष मात्रे, किरण संतोष वैद्य, संतोष मात्रे, सुशीला मात्रे, रुपसेन सत्याकर आणि ज्योती सत्याकर यांचा मृत्यू झाला. तर भूमेश्वर मात्रे, संगीता मात्रे, राजेंद्र पांचाळे, लक्ष्मी पांचाळे, संतोष वैद्य, राकेश बाहे आणि पिकअप चालक संदीप बाहे हे जखमी झाले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांसह ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. वाहनात अडकलेल्या जखमींना बाहेर काढून उपचारासाठी गोंदिया येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकरणी पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून अपघात नेमका कशामुळे झाला, याचा तपास सुरू आहे.

मृतांना गोंदिया जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आले आहे. गोंदिया ग्रामीण पोलिसांकडून त्यांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. उपचार घेत असलेल्या जखमींपैकी कोणी त्यांना ओळखत असल्यास त्यांची नावे कळू शकतात. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि गोंदिया ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. वाहनात अडकलेल्या जखमींना बाहेर काढून तातडीने उपचारासाठी गोंदिया येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर आहे.

दरम्यान, हे सर्वजण मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील असून रोजगाराच्या कामासाठी हैदराबादकडे जात असल्याची प्राथमिक माहिती आहे. अपघाताची नोंद गोंदिया ग्रामीण पोलिसांनी केली असून पुढील तपास सुरू आहे.

### थोडक्यात

## मनोज जरांगेंची तब्येत खालावली

**जालना :** मराठा आरक्षणाबाबत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे गेल्या १० दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. अशामध्ये मंगळवारी (८ सप्टेंबर) उपोषणाच्या अकराव्या दिवशी त्यांची तब्येत जास्तच खालावल्याची माहिती समोर आली. सततच्या उपोषणांमुळे त्यांचे वजन हे तब्बल ७ किलोंनी घातले आहे. तसेच, त्यांची शुगर लेव्हल आणि रक्तदाबदेखील कमी झाला आहे. अशामध्ये, त्यांच्या तब्येतीची बातमी कळताच सरकारकडील काही नेत्यांनी त्यांना ७ सप्टेंबर रोजी मध्यरात्री फोन केल्याची माहितीही समोर आली आहे.

८ सप्टेंबर रोजी पहाटे मनोज जरांगे पाटलांची तब्येत अचानक खालावल्याचे समोर आले. त्यांचे वजन कमी झाले असून शुगर आणि बीपी देखील कमी झाला. जालना येथील सिव्हिल सर्जन यांनी सोमवारी (७ सप्टेंबर) मध्यरात्री २.३० वाजता तपासणी केली. तसेच त्यांना वारंवार चक्कर येत असल्याचेही तपासानंतर समोर आले आहे. अशामध्ये, सोमवारी दुपारी त्यांनी पत्रकार परिषद घेतली होती. तेव्हाही बोलताना त्यांना उलट्या झाल्या असल्याचे यावेळी समोर आले.

## राज्यात ७० टक्के सोयाबीन नष्ट : वडेट्टीवार

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्यात गेल्या ३० ते ३५ दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याने सोयाबीनसह इतर खरीप पिके पूर्णपणे करपून गेली आहेत. जवळपास ७० टक्के सोयाबीन पीक नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याने बळिराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.



राज्यात पावसाने ओढ दिल्याने सोयाबीनसह खरीप पिकांवर संकट आले आहे. सोयाबीन, मूग, उडीद, मका, बाजरी, तूर खरीप पिके करपून गेली आहेत. तर मराठवाड्यातील पाणीसाठा पिण्यासाठी राखून ठेवा असा आदेश विभागीय आयुक्तांनी दिला आहे. वडेट्टीवार म्हणाले की, राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी सध्या अत्यंत गंभीर संकटात सापडला असून, जवळपास ७० टक्के सोयाबीनचे पीक नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडून ते पुन्हा कर्जबाजारी होण्याची भीती आहे. शेतकऱ्यांना या संकटातून वाचवण्यासाठी सरकारने युद्धपातळीवर उपाययोजना कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

एमपीएससी परीक्षांमधील गैरप्रकारांवर बोलताना वडेट्टीवार यांनी सत्ताधा-यांवर निशाणा साधला. एमपीएससी अध्यक्ष स्वच्छ असल्याचे सांगत आहेत. पण त्यांच्या काळात परीक्षा वारंवार रद्द झाल्या आहेत, त्याची जबाबदारी कोणाची आहे? केवळ मी स्वच्छ आहे असे सांगून प्रश्न सुटणार नाही, जेव्हा पेपर फुटले त्यासाठी जे जबाबदार होते त्यांच्यावरही कारवाई करावी, असे वडेट्टीवार म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, एमपीएससीच्या परीक्षांना भ्रष्ट स्वरूप देण्याचे काम सत्ताधाऱ्यांनी केले असून, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू आहे. पुण्यात विद्यार्थ्यांचा झालेला आक्रोश हाच या परिस्थितीचा पुरावा आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांपासून सरकार पळू शकत नाही.अहेरीतील कोसनपल्ली गावातील शेतकऱ्यांचा प्रश्न गंभीर आहे. येथील शेतकऱ्यांना जमिनीचे पट्टे मिळाले आहेत. मात्र गावाची डिजिटल नोंद उपलब्ध नसल्यामुळे सातबारा उताऱ्यावर मालकी हक्काची नोंद होत नाही. या प्रश्नासाठी शेतकरी आंदोलन करत आहेत. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून, हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. कोणत्याही परिस्थितीत कोसनपल्लीतील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा सातबारा आणि कायदेशीर मालकी हक्क मिळालाच पाहिजे यासाठी सातत्याने पाठपुरावा करत राहणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**अंगणवाडीत वाटाणा शिजेना**

शालेय आणि अंगणवाडी स्तरावर बालकांना पोषण आहार मिळावा यासाठी शासन कोट्यवधींचा निधी खर्च करते. मात्र, कुकरच्या तब्बल १० ते १२ शिट्ट्या करूनही वाटाणा कच्चाच राहत असल्याने हा वाटाणा आहे की दगड? असा संतापजनक सवाल आता उपस्थित केला जात आहे. पनवेल परिसरातील एकूण २७२ पैकी ११४ अंगणवाड्यांची पर्यवेक्षकांनी नुकतीच पाहणी केली.

**चिमुकल्यांच्या ताटातील घास कमिशनखोरीचा हप्ता नाही!**

विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडियावर एक पोस्टही केली आहे. त्यात ते म्हणतात, गरीब चिमुकल्यांच्या ताटात पोषण आहाराच्या नावाखाली निकृष्ट दजार्चे वाटाणे देण्याचे पाप हे सरकार करत आहे. कमिशनखोरीसाठी एवढ्या खालच्या थराला जाणाऱ्या सरकारमधल्या मंत्री आणि अधिकाऱ्यांना थोडी तरी लाज वाटली पाहिजे.

## ७२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा गुजरातमध्ये

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या ७२ वर्षांच्या इतिहासात प्रथमच एक अत्यंत ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. आतापर्यंत नेहमी देशाची राजधानी नवी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित केला जाणारा हा भव्य सोहळा यंदा दिल्लीबाहेर आयोजित केला जाणार आहे. गुजरातमधील केवडिया (सध्याचे नाव एकता नगर) येथील जगातील सर्वात उंच 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' समोर हा ७२ वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. येत्या २२ सप्टेंबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विजेत्यांना हे मानाचे पुरस्कार प्रदान केले जातील. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा दिल्लीच्या बाहेर देशाच्या विविध भागांत आयोजित करण्याचा मोठा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. 'एक भारत, श्रेष्ठ भारत' ही संकल्पना प्रत्यक्षात आणणे आणि प्रादेशिक विविधतेला सन्मान देणे हा यामागील मुख्य उद्देश आहे.




१९५४ मध्ये स्थापन झालेले हे राष्ट्रीय पुरस्कार भारतीय सिनेसृष्टीतील सर्वात प्रतिष्ठित सन्मान मानले जातात. ७ दशकांपासून दिल्लीत होणाऱ्या या सोहळ्याचे ठिकाण बदलून यंदा सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ५९७ फूट उंच स्मारकासमोर (स्टॅच्यू ऑफ युनिटी) ठेवण्यात आले आहे. वर्ष २०२४ मधील भारतीय सिनेमातील उत्कृष्ट कामगिरीसाठी हे पुरस्कार दिले जाणार असून यामध्ये अनेक दिग्गज कलाकारांचा गौरव केला जाईल.

सर्वोत्कृष्ट चित्रपट : आर्टिकल ३७०
सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीः यामी गौतम (आर्टिकल ३७०)
सर्वोत्कृष्ट अभिनेता (विभागून): मामुटी ('ब्रह्मयुगम')
आणि कार्तिक आर्यन ('चंदू चॅम्पियन')
सर्वोत्कृष्ट पदार्पण दिग्दर्शकः रणदीप हुड्डा ('स्वातंत्र्य वीर सावरकर')
सर्वोत्कृष्ट नॉन-फीचर फिल्मः 'भंगार'
सर्वोत्कृष्ट डॉक्युमेंट्री (ज्युरी): 'राम-नामी'यंदाच्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये प्रादेशिक भाषांमधील चित्रपटांचा मोठा दबदबा पाहायला मिळणार आहे. यामध्ये मराठी, संथाली, तमिळ, मल्याळम, तेलगू, कन्नड, तुळू आणि गढवाली भाषांमधील उत्कृष्ट चित्रपटांचा गौरव केला जाईल.

विशेष म्हणजे, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या नॉन-फीचर फिल्म श्रेणीमध्ये पहिल्यांदाच एका 'संथाली' भाषेतील चित्रपटाला सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय 'कल्कि २८९८ एडी', 'अमरन', 'पुष्पा २ : द रुल', 'भूल भुलैया ३' आणि 'स्त्री २' यांसारख्या गाजलेल्या चित्रपटांनाही विविध श्रेणींमध्ये पुरस्कार मिळाले आहेत. सिनेमावरील उत्कृष्ट लेखनासाठी, सर्वोत्कृष्ट चित्रपट समीक्षकः संजीव श्रीवास्तव हे आहे.

## लातुरात मराठा आरक्षणासाठी तरुणाची आत्महत्या

**वृत्तसंस्था, लातूर**

शिरुर अंनतपाळ तालुक्यातील सोमठाणा येथील एका तरुणाने विहिरीत उडी घेत आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली. याबाबत संतप्त जमावाकडून पार्थिव येरोळमोड चौकात ठेवत रात्री ७ वाजल्यापासून उशिरापर्यंत रास्ता रोको सुरूच होता. परिणामी, लातूर-उदगीर महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सुनील विनायक बिरादार(४५) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.





सोमठाणा गावातील रहिवासी सुनील बिरादार यांनी मंगळवारी दुपारी सताळा शिवारातील वसंत बिरादार यांच्या शेतातील विहिरीत उडी घेत आत्महत्या केल्याची घटना घडली. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आत्महत्या करत असल्याची चिठ्ठी लिहून विहिरीच्या काठावर ठेवल्याचे समोर आले आहे. मराठा आरक्षण समन्वय समितीच्या संतप्त कार्यकर्त्यांनी आत्महत्या केलेल्या युवकाचे पार्थिव एका वाहनातून येरोळमोड येथे रात्री ७ वाजता आणले. तेथेच पार्थिव ठेवून लातूर-उदगीर महामार्गावर ठिय्या मांडला.

रात्री उशिरापर्यंत वाहतूक ठप्प होती. दरम्यान, येरोळमोड येथे तहसीलदार किशोर यादव, नायब तहसीलदार लालासाहेब कांबळे यांनी भेट देत संतप्त कार्यकर्त्यांना शांत राहण्याचे आवाहन करून रास्ता रोको आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांनी मयत तरुणाच्या कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी. कुटुंबातील एका व्यक्तीला मदत करावी, अशी मागणी करत एक मराठा, लाख मराठा घोषणा देत रात्री उशिरापर्यंत रास्ता रोको सुरूच होता.

## खेळाडूंच्या नोकर भरतीचे सुधारित आरक्षण धोरण मंजूर

**वृत्तसंस्था, मुंबई**

राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत क्रीडा, आरोग्य, वस्त्रोद्योग आणि विधी व न्याय विभागाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण आणि धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यातील गुणवंत खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये मिळणाऱ्या आरक्षणाबाबत सुधारित धोरण लागू करण्याचा मोठा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. याशिवाय सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या सहकार्याने नवा प्रकल्प राबवण्यास आणि सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे नवीन सत्र न्यायालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.राज्यातील यशस्वी आणि गुणवंत खेळाडूंना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रांतील नोकऱ्यांमध्ये मिळणाऱ्या ५ टक्के आरक्षणाबाबत सुधारित धोरण लागू करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या नवीन सुधारित धोरणामुळे पूवीर्चे सर्व शासन निर्णय , शासन शुद्धिपत्रके, परिपत्रके आणि संबंधित पत्रे पूर्णपणे रद्द करण्यात आली आहेत.

## सौदी अरेबियातील ४ शहरांवर हल्ला

**वृत्तसंस्था, येमेन :** येमेनमध्ये हुथी आणि सौदी अरेबिया यांच्यात पुन्हा एकदा तणाव वाढला आहे. हुथी बंडखोरांनी सोमवारी सौदी अरेबियाच्या चार शहरांवर हल्ला केला, ज्यात महिला आणि मुलांसह ७३ जण जखमी झाले. सौदी अरेबियातील आभा विमानतळ, किंग खालिद हवाई तळ आणि अरामकोच्या काही आस्थापनांवरही हल्ले झाल्याचे वृत्त आहे. या हल्ल्यांच्या काही तास आधी, हुथी बंडखोरांनी आरोप केला की सौदी अरेबियाने अल-हझम शहरातील तुरुंगावर हल्ला करून ११ जणांना ठार केले. मृतांमध्ये एका मुलाचा समावेश होता, जो आपल्या वडिलांना भेटायला आईसोबत आला होता. तुरुंग रक्षकाच्या म्हणण्यानुसार, एका महिलेसह ३५ कैदी अजूनही ढिगाऱ्याखाली अडकले आहेत सौदी अरेबियाने या हल्ल्याचा बदला घेणार असल्याचे म्हटले आहे.

सौदीच्या नेतृत्वाखालील येमेनी आघाडीचे प्रवक्ते मेजर जनरल तुर्की अल-मलिकी यांनी मंगळवारी सांगितले की, हुथींनी सौदी अरेबियातील नागरी आणि आर्थिक लक्ष्यांवर हल्ले केले. ते म्हणाले की, हे हल्ले सौदीच्या सार्वभौमत्वाच्या विरोधात असून नागरिकांसाठी धोकादायक आहेत. अल-मलिकी यांनी सांगितले की, आघाडी या हल्ल्यांना प्रत्युत्तर देईल आणि धोका थांबवण्यासाठी आवश्यक लष्करी कारवाई करेल. तथापि, हुथींनी हे हल्ले केव्हा केले हे त्यांनी स्पष्ट केले नाही. २०२२ मध्ये येमेनमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या मध्यस्थीने युद्धविराम झाला. यानंतर मोठ्या प्रमाणावरील लढाई लक्षणीयरीत्या कमी झाली, परंतु दोन्ही बाजूंमध्ये कोणताही कायमस्वरूपी शांतता करार झाला नाही. २०२६ मध्ये परिस्थिती पुन्हा बिघडली. येमेनमध्ये हुथी आणि सौदी-समर्थित येमेनी सैन्यामधील हल्ले वाढले. इराण अमेरिकेसोबत युद्धात गुंतलेला आहे. येमेनी सरकारला हुथींनी व्यापलेले प्रदेश परत मिळवायचे आहेत,

## दिल्लीच्या माजी मुख्य सचिवांचा मृतदेह पंख्याला लटकलेल्या स्थितीत आढळला

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

दिल्लीचे माजी मुख्य सचिव आणि १९७५ च्या बॅचचे आयएएस अधिकारी, ७४ वर्षीय राकेश मेहता यांनी नोएडाच्या सेक्टर ८२ मधील त्यांच्या घरी आत्महत्या केली. मिळालेल्या माहितीनुसार, घटनेवेळी पत्नी सुमंती मेहता या डेहराडूनला आपल्या मुलाला भेटायला गेल्या होत्या. जेव्हा त्यांचे पती वारंवार फोनला उत्तर देत नव्हते, तेव्हा त्यांना काहीतरी गडबड असल्याचा संशय आला आणि त्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी सांगितले की, ६ सप्टेंबर रोजी डायल-११२ वरून कॉल आल्यानंतर फेज-२ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. फ्लॅटचा दरवाजा आतून बंद होता, त्यामुळे पोलीस पथकाने गेट तोडून आत प्रवेश केला आणि मृतदेह बाहेर काढला. पोलीस आणि फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळाची कसून तपासणी केली.

**घटनास्थळावरून सुसाईड नोट सापडली**

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार नोएडा पोलिसांना घटनास्थळावरून एक सुसाईड नोट सापडली आहे. या नोटमध्ये, माजी मुख्य सचिवांनी हे टोकाचे पाऊल उचलण्यामागे मानसिक आणि आरोग्याच्या समस्या असल्याचे कारण दिले आहे. राकेश मेहता यांनी माजी मुख्यमंत्री शीला दीक्षित यांच्या कार्यकाळात तीन वर्षांहून अधिक काळ दिल्लीचे मुख्य सचिव म्हणून काम पाहिले.



त्यांनी २००७ मध्ये हे पद स्वीकारले आणि नोव्हेंबर २०१० मध्ये ते सेवानिवृत्त झाले. त्यांच्याच कार्यकाळात २०१० चे राष्ट्रकुल खेळ दिल्लीत आयोजित करण्यात आले होते. दिल्लीत वाहतूक, ऊर्जा आणि नागरी पायाभूत सुविधांचे अनेक मोठे प्रकल्प राबवण्याचे श्रेय त्यांना दिले जाते.

**मुख्य सचिव पदासह विविध महत्त्वाच्या पदांवर काम**

माजी सहकाऱ्यांच्या मते, राकेश मेहता यांनी दिल्ली सरकारमध्ये २००७ ते नोव्हेंबर २०१० पर्यंत मुख्य सचिव पदासह विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले होते आणि २०१० च्या राष्ट्रकुल खेळांदरम्यान दिल्ली प्रशासनासाठी महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या. लोधी रोड स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीस आता त्यांच्या आत्महत्येमागील परिस्थितीचा तपास करत आहेत.

संपादकीय लेखणीतून...

# डीजे कसा वाजे!

गणेशोत्सवातील डीजेचा वाढता दणदणाट, कानठळ्या बसवणारा आवाज आणि लेझर किरणांच्या अतिवापरामुळे सर्वसामान्य नागरिकांना होणाऱ्या अस त्रासाविरोधात पुण्यात रविवारी उत्स्फूर्त जनआक्रोश दिसून आला. पुणे महानगरपालिकेच्या बैठकीत डीजेविरोधात धाडसी आणि रोखठोक भूमिका मांडणारे विद्यानंद बापट यांच्या समर्थनासाठी हजारो पुणेकर बालगंधर्व चौकामध्ये जमले आणि तेथून पुणे महानगरपालिकेपर्यंत एक विराट मोर्चा काढण्यात आला. नागपुरात कायद्याला मान, सोलापूरला परंपरेचे भान, मग पुण्यातच लाऊडस्पीकरला का मोकळे रान? अशा तीव्र घोषणा देत पुणेकरांनी आपला संताप व्यक्त केला. पुणेकर अगेन्स्ट लाऊडस्पीकर मंचाच्यावतीने या भव्य निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. हा मोर्चा कोणत्याही राजकीय दबावाशिवाय केवळ पुणेकरांच्या मनातील खदखद आणि त्रासामुळे अत्यंत उत्स्फूर्तपणे रस्त्यावर उतरला होता.या आंदोलनात ज्येष्ठ पत्रकार, निवृत्त वरिष्ठ पोलिस अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, महिला, डॉक्टर, पर्यावरणप्रेमी आणि तरुण वर्ग (जेन झी) सहभागी झाला होता. पुण्यात गणेशोत्सव आणि मिरवणुका नक्कीच झाल्या पाहिजेत; परंतु गत दोन दशकात या उत्सवाला अत्यंत बटबटीत स्वरूप प्राप्त झाले असून केवळ लायटिंग, कर्णकर्कश आवाज आणि प्रचंड गोंगाट उरला आहे. या अति गर्दीमुळे लोकांना वेळेत उपचार न मिळाल्याने आणि डीजेच्या धक्क्यामुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. आपल्या शहराचे आणि मुलाबाळांचे भविष्य निरोगी राहावे यासाठी सामान्य पुणेकरांना रस्त्यावर उतरावे लागले आहे. रस्ते हे प्रामुख्याने वाहतुकीसाठी आहेत त्यामुळे वाहतुकीला अडथळा ठरणारे वर्षभरातील सर्व उत्सव, मिरवणुका आणि जयंत्या रस्त्यावरून हटवून मोकळ्या मैदानामध्ये आयोजित केल्या पाहिजेत ज्यामुळे उर्वरित समाजाला कोणताही उपद्रव होणार नाही.

डीजेच्या आवाजामुळे हृदय धडधडते, कानाला त्रास होतो, मुले शाळेत जाऊ शकत नाहीत आणि लोक दुकाने उघडू शकत नाहीत. आवाजामुळे रक्तदाब वाढतो आणि प्रचंड त्रास होतो. मोबाईल ॲप्सवर दाखवला जाणारा डेसिबलचा आकडा पूर्णपणे खोटा असतो. कारण लाऊडस्पीकर नसतानाही आजूबाजूचा नेहमीचा आवाज ९० डेसिबलच्या आसपास असतो.६० डेसिबलचा नियम लाऊडस्पीकर सुरू असताना पाळला जाणे कधीही शक्य नसते. पुण्यातील मोर्चामध्ये जेन झी आणि मिलेनियल्स पिढीचा उत्स्फूर्त सहभाग होता. या तरुणांनी डीजे बंदीची मागणी केली. डीजेच्या आवाजामुळे लोकांमध्ये नैराश्य आणि तीव्र चिंता वाढून मानसिक अस्वस्थता निर्माण होते. पुण्यात अशी स्थिती आहे की, गणेशोत्सव जवळ आला की घरच्यांच्या अंगावर काटा येतो. घरात वृद्ध आजी-आजोबा असल्याने त्यांना एकटे सोडून बाहेर जाता येत नाही. आवाजाच्या तीव्रतेने घरातील काचा थरथरतात. तरुणांनी अशा चुकीच्या गोष्टींना संस्कृती किंवा धर्मविरोधी ठरवणाऱ्या नरेटिव्हवर आक्षेप घेतला आहे. डीजेला विरोध म्हणजे संस्कृतीला किंवा सणाला विरोध नव्हे. पुण्यामध्ये सध्या मेट्रोच्या कामामुळे रस्ते आधीच अरुंद झाले असून त्यात ठिकठिकाणी उभारलेले मंडप आणि ढोल-ताशांच्या वादनामुळे प्रचंड वाहतूककोंडी निर्माण होते त्यावर प्रशासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कमीत कमी ध्वनीप्रदूषण करून उत्सव साजरे केले पाहिजेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

कमीत कमी म्हणजे किती डेसिबल्स हे त्यांनी सांगितले नाही. ऐन उत्सवात अशी ध्वनीप्रदूषण पातळी तपासणार कोण? सगळ्यांनी एकाच वेळी कितीही कमी ध्वनीप्रदूषण केले तरी व्हायचा तोच परिणाम होणार. पारंपारिक पद्धतीने म्हणजे त्यात ढोल-ताशा पथकेही गृहीत धरली असतील तर त्यामुळेही मोठे ध्वनीप्रदूषण होतेच. आगमन आणि विसर्जनाच्या मिरवणुकांमध्ये अनेक पथके एकत्र येतात तेव्हा अक्षरशः घर थरथरल्यासारखे जाणवते, असा अनेकांचा अनुभव आहे. धर्मपालनाचे आणि उपासनेचे स्वातंत्र्य भारतीय संविधानाने सर्वांना दिले आहे; पण या स्वातंत्र्याचा उपभोग घेताना भान हरपले तर जीवित, आर्थिक आणि पर्यावरणीय हानी होते. गणेशोत्सवात बुद्धीलाच सोडचिठ्ठी दिली जात आहे. वरचढ होण्याच्या स्पर्धेत सण धूमधडाक्यात साजरे होऊ लागले अन् मूळ उद्देशच बाजूला फेकला गेला, असेच चित्र दिसते आहे. बापटांचा प्रतिवाद करणाऱ्यांकडे मुद्दे नसल्याने त्यांना गुद्यांवर उतरावे लागले, हा त्यांचा पराभव आहे.



# इस्रोचे नवे पर्व : खाजगीकरण, आव्हानांचा वेध आणि जागतिक दृष्टिकोन

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

भारतीय अंतराळ संशोधन संस्था सध्या एका ऐतिहासिक स्थित्यंतरातून जात असून, खाजगीकरण, व्यावसायिक आव्हाने आणि जागतिक वर्चस्व या त्रिसूत्रीवर आपले नवे पर्व घडवत आहे. पारंपारिकपणे सरकारी नियंत्रणाखाली चालणाऱ्या या क्षेत्राला आता खुल्या बाजारपेठेची आणि नाविन्यपूर्ण स्टार्टअप्सची जोड मिळत आहे.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था ही गेल्या अनेक दशकांपासून भारताच्या वैज्ञानिक प्रगतीचे आणि राष्ट्रीय अभिमानाचे सर्वोच्च प्रतीक राहिली आहे. पूर्णपणे सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या या संस्थेने अतिशय मर्यादित संसाधनांमध्ये काम करत मंगळयान आणि चंद्रयान यांसारख्या ऐतिहासिक मोहिमा यशस्वी करून जगाला अचंबित केले आहे. मात्र, अलिकडच्या काळात भारत सरकारने अंतराळ क्षेत्रात व्यावसायिकतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि जागतिक स्तरावर देशाचा ठसा उमटवण्यासाठी खाजगी कंपन्यांचा सहभाग वाढवण्याचे नवे धोरण स्वीकारले आहे. या नव्या धोरणामुळे इस्रोच्या अंतर्गत वर्तुळात मोठे मतभेद निर्माण झाले असून, संस्थेच्या नऊ प्रमुख कर्मचारी संघटनांनी एकत्र येत इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांना पत्र लिहून या वाढत्या खाजगीकरणाच्या आणि तंत्रज्ञान हस्तांतरणाच्या प्रस्तावावर तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

या वादाचे मूळ 'इन-स्पेस' भारतीय राष्ट्रीय अंतराळ संवर्धन आणि प्रमाणीकरण केंद्र या नव्याने स्थापन झालेल्या संस्थेच्या धोरणांमध्ये दडलेले आहे. इन-स्पेसचे अध्यक्ष पवन गोएंका यांच्या नेतृत्वाखालील समितीने इस्रोच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल सुचवले आहेत. या प्रस्तावानुसार, इस्रोने भविष्यात आपले लक्ष केवळ प्रगत संशोधन, नवीन तंत्रज्ञानाचा विकास आणि गगनयान किंवा डीप स्पेस मिशन्ससारख्या महत्त्वाकांक्षी मोहिमांवर केंद्रित करावे. त्याचवेळी, पीएसएलव्ही आणि एलव्हीएम३ सारख्या रॉकेट्सचे नियमित उत्पादन तसेच उपग्रहांचे व्यावसायिक संचालन हे काम पूर्णपणे खाजगी कंपन्यांकडे सोपवण्यात यावे, अशी सरकारची योजना आहे. सध्या अब्जावधी डॉलर्सच्या जागतिक अंतराळ अर्थव्यवस्थेत भारताचा वाटा जेमतेम २ ते ३ टक्के इतकाच आहे. हा वाटा वेगाने वाढवण्यासाठी, व्यावसायिक उड्डाणांची संख्या वाढवण्यासाठी आणि जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी खाजगी क्षेत्राला अंतराळ निर्मितीच्या मुख्य प्रवाहात आणणे अपरिहार्य असल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

तथापि, या धोरणाला इस्रोच्या कर्मचाऱ्यांकडून आणि शास्त्रज्ञांकडून कडाडून विरोध होत आहे. कर्मचाऱ्यांच्या मते, इस्रोने आजवर जे काही तंत्रज्ञान विकसित केले आहे, ते कोट्यवधी भारतीयांच्या कररुपी पैशातून आणि अनेक दशकांच्या अथक परिश्रमातून उभे राहिले आहे. असे असताना, हे स्वदेशी आणि मौल्यवान तंत्रज्ञान नफा कमावणाऱ्या खाजगी कंपन्यांच्या हाती नाममात्र दरात किंवा सहजपणे सोपवणे अन्यायकारक आहे. याशिवाय, अंतराळ तंत्रज्ञान हे अत्यंत संवेदनशील स्वरूपाचे असते, ज्याचा वापर दुहेरी (लष्करी आणि नागरी) कारणांसाठी होऊ शकतो. त्याचे नियंत्रण आणि उत्पादन खाजगी क्षेत्राकडे गेल्यास भविष्यात राष्ट्रीय सुरक्षेलाही धोका निर्माण होऊ शकतो. तसेच, इस्रोचा मूळ उद्देश देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी अंतराळ विज्ञानाचा वापर करणे हा राहिला आहे, तर खाजगी कंपन्यांचा मुख्य हेतू केवळ व्यावसायिक नफा कमावणे हाच असतो. या व्यावसायिक दृष्टिकोनामुळे संस्थेच्या मूळ वैज्ञानिक आणि सामाजिक उद्देशाला हरताळ फासला जाईल, अशी रास्त भीती कर्मचाऱ्यांना वाटत आहे. यासोबतच, जर मुख्य उत्पादन आणि संचालन विभाग खाजगी कंपन्यांकडे गेले, तर सध्या या विभागांमध्ये काम करणाऱ्या हजारो तंत्रज्ञ आणि अभियंत्यांच्या नोकऱ्यांचे आणि भवितव्याचे काय होणार, हा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

या संपूर्ण वादाच्या आणि धोरणात्मक बदलाच्या पार्श्वभूमीवर, अमेरिकेची अंतराळ संस्था 'नासा' आणि त्यांनी राबवलेले खाजगीकरणाचे मॉडेल अभ्यासणे अत्यंत समर्पक ठरते. २०११ नंतर नासाने स्वतःचे स्पेस शटल तयार करणे आणि चालवणे थांबवले व 'कमर्शियल क्रू' आणि 'कमर्शियल कार्गो' कार्यक्रमांतर्गत स्पेसएक्स आणि बोईंग सारख्या खाजगी कंपन्यांना सामावून घेतले. परंतु, नासाने या कंपन्यांना स्वतःचे प्रस्थापित तंत्रज्ञान विनामोबदला दिले नाही, तर त्यांना स्वतःचे रॉकेट आणि स्पेसक्राफ्ट नव्याने विकसित करण्यासाठी आर्थिक आणि तांत्रिक पाठबळ दिले. आज नासा या कंपन्यांकडून केवळ एका ग्राहकाप्रमाणे 'टॅक्सी सेवेसारखी' सेवा विकत घेते आणि त्याबदल्यात पैसे मोजते. या मॉडेलमुळे स्पेसएक्सने 'पुन्हा वापरता येण्याजोगे रॉकेट' तंत्रज्ञान विकसित केले, ज्यामुळे नासाचा अंतराळ मोहिमांचा खर्च लक्षणीयरीत्या कमी झाला. तसेच, नियमित उड्डाणांची जबाबदारी खाजगी क्षेत्राकडे गेल्यामुळे नासाला आपली संपूर्ण ऊर्जा आणि वेळ 'आर्टेमिस'सारख्या मानवी चंद्र मोहिमेवर आणि मंगळ मोहिमेवर केंद्रित करता आला.

नासा आणि इस्रोच्या सद्यस्थितीत आणि धोरणात एक अत्यंत मूलभूत फरक आहे, ज्यामुळे हा विरोध उभा राहिला आहे. नासाने खाजगी कंपन्यांना स्वतःचे तंत्रज्ञान शून्यातून विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले आणि एक स्वतंत्र स्पर्धात्मक बाजारपेठ उभी केली. याउलट, भारतात सरकारी निधीतून आधीच यशस्वीरीत्या प्रस्थापित झालेले आणि उत्पादनात असलेले तंत्रज्ञान खाजगी कंपन्यांना थेट हस्तांतरित केले जात असल्याचा कर्मचाऱ्यांचा मुख्य आक्षेप आहे. भारताला जर जागतिक अंतराळ अर्थव्यवस्थेत मोठी झेप घ्यायची असेल आणि इस्रोला केवळ प्रगत संशोधनावर लक्ष केंद्रित करायचे असेल, तर खाजगी क्षेत्राला सोबत घेणे ही काळाची गरज आहे. परंतु, हे करत असताना इस्रोच्या कर्मचाऱ्यांचा विश्वास संपादन करणे आणि त्यांच्या चिंतेचे निराकरण करणे तितकेच गरजेचे आहे. सार्वजनिक हिताचे रक्षण, राष्ट्रीय सुरक्षेची हमी आणि देशाची व्यावसायिक प्रगती यांचा सुवर्णमध्य साधूनच भारताला अंतराळ महासत्ता बनण्याच्या दिशेने योग्य पाऊल टाकता येईल. प्रशासनाने या तंत्रज्ञान हस्तांतरणाबाबत पारदर्शक धोरण आखून कर्मचाऱ्यांच्या शंकांचे तातडीने निरसन करणे, हे यावर तोडगा काढण्याचे पहिले आणि अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

थोडक्यात, इस्रोचे हे नवे पर्व केवळ सरकारी यशापुरते मर्यादित नसून, ते भारताच्या संपूर्ण औद्योगिक आणि वैज्ञानिक क्षमतेचे प्रकटीकरण आहे. आव्हानांवर मात करत, खाजगी क्षेत्राला सोबत घेऊन चालणारी ही नवी रणनीती भारताला आगामी काळात जागतिक अंतराळ अर्थव्यवस्थेचा एक महानायक बनवू शकते.

- ९५६१५९४३०६

# भारतीय क्रिकेटचा सुवर्ण इतिहासः सर्वाधिक 'प्लेअर ऑफ द मॅच' जिंकणारे आपले खरे मॅच विनर

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

क्रिकेट हा भारतात केवळ एक खेळ नसून तो कोट्यवधी रसिकांचा श्वास आहे. या खेळात विजय मिळवणे जितके महत्त्वाचे असते, तितकेच मोलाचे असते ते दबावाच्या क्षणी संघासाठी संकटमोचक ठरणे. जेव्हा जेव्हा भारतीय संघ अडचणीत सापडला, तेव्हा ज्या खेळाडूंनी स्वतःच्या खांद्यावर जबाबदारी घेऊन सामन्याचे पारडे फिरवले, त्यांना 'प्लेअर ऑफ द मॅच' (सामनावीर) पुरस्काराने गौरवले गेले. आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तीनही फॉरमॅटमध्ये (कसोटी, एकदिवसीय आणि टी-२०) मिळून सर्वाधिक वेळा हा बहुमान पटकावणाऱ्या ३५ भारतीय शिलेदारांची ही यादी भारतीय क्रिकेटच्या एका अद्भूत प्रवासाची, सातत्याची आणि जागतिक वर्चस्वाची साक्ष देते.

### अव्वल त्रिमूर्ती आणि ऐतिहासिक विजयवीर

सचिन तेंडुलकर (७६ वेळा): आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शतकांचे शतक ठोकणाऱ्या सचिनच्या नावावर सर्वाधिक ७६ वेळा सामनावीर होण्याचा जागतिक विक्रम आहे. नव्वदच्या दशकात जेव्हा संघ अडचणीत असायचा, तेव्हा "सचिन खेळतोय तोवर आशा आहे" ही भावना असायची. 'शारजाचे डेझर्ट स्टॉर्म' असो वा २००३ च्या विश्वचषकातील पाकिस्तानविरुद्धची ती वादळी खेळी, सचिनने कित्येक सामने एकहाती जिंकवले.

विराट कोहली (७१ वेळा): आधुनिक क्रिकेटचा 'चेस मास्टर' म्हणून ओळखला जाणारा विराट कोहली ७१ पुरस्कारांसह सचिनच्या विक्रमाच्या अगदी उंबरठ्यावर आहे. आव्हानाचा पाठलाग करताना दाखवलेला प्रचंड आत्मविश्वास, २०२० च्या दशकातील ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या इनिंग्स किंवा २०२२ च्या टी-२० विश्वचषकातील पाकिस्तान विरुद्धचा मेलबर्नमधील तो अविस्मरणीय विजय कोहलीच्या अतुलनीय कौशल्याची साक्ष देतो.

रोहित शर्मा (४५ वेळा): एकदिवसीय क्रिकेटमध्ये तीन द्विशतके झळकावणारा भारताचा माजी कर्णधार 'हिटमॅन' रोहित शर्मा ४५ पुरस्कारांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. रोहितची शैली शांत पण आक्रमक; डावाची सुरुवात सावध करून नंतर प्रतिस्पर्ध्यांच्या गोलंदाजीची पिसं काढण्यात त्याचा हातखंडा आहे.

### आक्रमकतेचे युग आणि मधल्या फळीतील संकटमोचक

सौरव गांगुली (३७) आणि वीरेंद्र सेहवाग (३१): सौरव गांगुलीने भारतीय संघाला डोळ्यात डोळे घालून लढायला शिकवले. लॉर्ड्सच्या बाल्कनीपासून ते टोरांटोमधील सातत्यपूर्ण गोलंदाजी-फलंदाजीपर्यंत दादाने अनेक सामने जिंकवून दिले. तर दुसरीकडे वीरेंद्र सेहवाग म्हणजे प्रतिस्पर्धी गोलंदाजांची झोप उडवणारे वादळ; कसोटीत पहिल्याच चेंडूवर चौकार मारून सामना खिशात घालणारा सेहवाग ३१ पुरस्कारांसह अग्रस्थानी राहिला.

| खेळाडूचे नाव | पुरस्कार संख्या | खेळाडूचे नाव | पुरस्कार संख्या |
|---|---|---|---|
| सचिन तेंडुलकर | ७६ | सुरेश रैना | १५ |
| विराट कोहली | ७१ | नवजोत सिंग सिद्धू | १५ |
| रोहित शर्मा | ४५ | कुलदीप यादव | १४ |
| सौरव गांगुली | ३७ | रवि शास्त्री | १४ |
| युवराज सिंग | ३४ | हार्दिक पंड्या | १३ |
| वीरेंद्र सेहवाग | ३१ | इरफान पठाण | १३ |
| रवींद्र जडेजा | २६ | कृष्णमाचारी श्रीकांत | १३ |
| राहुल द्रविड | २५ | झहीर खान | १२ |
| मोहम्मद अजहरूद्दीन | २३ | केएल राहुल | १२ |
| एमएस धोनी | २३ | जवागल श्रीनाथ | १२ |
| शिखर धवन | १९ | अक्षर पटेल | ११ |
| कपिल देव | १९ | शुभमन गिल | ११ |
| रविचंद्रन अश्विन | १७ | हरभजन सिंग | ११ |
| सूर्यकुमार यादव | १७ | भुवनेश्वर कुमार | ११ |
| अनिल कुंबळे | १६ | सुनील गावस्कर | १० |
| जसप्रीत बुमराह | १६ | मोहिंदर अमरनाथ | १० |
| गौतम गंभीर | १५ | व्हीव्हीएस लक्ष्मण | १० |
| अजय जडेजा | १० | | |

### उगवती पिढी आणि उज्ज्वल भविष्य

या यादीत लक्ष वेधून घेतात ती सध्याची तरुण पिढी. सूर्यकुमार यादवने टी-२० क्रिकेटमध्ये 'मिस्टर ३६०' अशी ओळख बनवून अल्पावधीत १७ वेळा सामनावीराचा किताब जिंकला आहे. त्याच्या सोबतीला अक्षर पटेल (११) आणि शुभमन गिल (११) यांनीही कमी कालावधीत या दिग्गज खेळाडूंच्या यादीत आपले नाव कोरले आहे.

युवराज सिंग (३४): भारताच्या २००७ टी-२० विश्वचषक आणि २०११ एकदिवसीय विश्वचषक विजयाचा खरा शिल्पकार म्हणजे युवराज. महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये मोठ्या संघांविरुद्ध तुफानी फलंदाजी आणि अचूक डावखुरी फिरकी या जोरावर युवीने ३४ वेळा हा बहुमान पटकावला.

राहुल द्रविड (२५) आणि मोहम्मद अजहरूद्दीन (२३): 'द वॉल' राहुल द्रविडने परदेशातील कठीण खेळपट्ट्यांवर तासनतास फलंदाजी करून भारताला ऐतिहासिक कसोटी विजय मिळवून दिले (जसे की २००३ चे अँडलेड किंवा २००१ चे कोलकाता). अजहरूद्दीनच्या मनगटी फलंदाजीने नव्वदच्या दशकात २३ वेळा भारताला सामना जिंकवून दिला.

महेंद्रसिंग धोनी (२३): शांत डोके आणि जगातील सर्वोत्तम फिनिशर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धोनीने २३ वेळा हा पुरस्कार जिंकला. २००११ च्या विश्वचषक फायनलमधील ती ९१ धावांची अजरामर खेळी आजही चाहत्यांच्या अंगावर काटा आणते.

### ऑलराऊंडर्स आणि गोलंदाजांची भेदक कामगिरी

क्रिकेटमध्ये फलंदाजांचे वर्चस्व मानले जात असले, तरी गोलंदाजांच्या आणि अष्टपैलू खेळाडूंच्या जोरावर भारताने असंख्य सामने फिरवले आहेतः

कपिल देव (१९): भारताला पहिला विश्वचषक जिंकून देणारे 'हरियाणा हरिकेन' कपिल देव यांनी बॅट आणि बॉल दोन्हीने १९ वेळा सामनावीराचा मान मिळवला. १९८३ च्या झिम्बाब्वेविरुद्धच्या १७५ धावा आजही भारतीय क्रिकेटचे सुवर्णपान आहेत.

रवींद्र जडेजा (२६) आणि आर. अश्विन (१७): घरच्या मैदानावर भारताचा कसोटीतील अभेद्य गड राखण्यात या जोडीचा मोठा वाटा आहे. जडेजाने बॅट, बॉल आणि आपल्या अफलातून क्षेत्ररक्षणाने तब्बल २६ वेळा, तर अश्विनने आपल्या चतुर फिरकीने १७ वेळा हा पुरस्कार जिंकला आहे.

अनिल कुंबळे (१६) आणि जसप्रीत बुमराह (१६): कुंबळेच्या ६१९ कसोटी विकेट्स आणि एका डावात १० विकेट्स घेण्याचा पराक्रम आजही स्मरणात आहे. दुसरीकडे, आधुनिक क्रिकेटमधील यॉर्कर किंग जसप्रीत बुमराहने अवघ्या काही वर्षांत आपल्या घातक गोलंदाजीने १६ वेळा भारताला विजयी सलामी दिली आहे.

झहीर खान (१२) आणि जवागल श्रीनाथ (१२): २००३ आणि २०११ च्या विश्वचषकांमध्ये भारताच्या वेगवान माऱ्याचे नेतृत्व करणाऱ्या या दोन्ही गोलंदाजांनी प्रतिस्पर्ध्यांच्या नाकीनऊ आणत १२-१२ वेळा सामनावीराचा पुरस्कार पटकवला.

### भारताचे सर्व ३५ 'मॅच विनर' एका दृष्टीक्षेपात

सुनील गावस्कर आणि मोहिंदर अमरनाथ यांनी १९७०-८० च्या दशकात रोवलेले हे बीज, सचिन-द्रविड-गांगुली-कुंबळे यांनी वाढवले, धोनी-विराट-रोहित यांनी त्याला यशाच्या शिखरावर नेले आणि आता गिल-सूर्या-बुमराह ही पिढी तोच वारसा समर्थपणे पुढे नेत आहे. ही केवळ आकडेवारी नसून प्रत्येक भारतीयाचा ऊर अभिमानाने भरून आणणारा विजयाचा सुवर्णप्रवास आहे.

- ९०९६३७२०८२

# बाल क्रांतिकारक शिरीषकुमार

शिरीषकुमार हे बाल क्रांतिकारक होते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेकांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनीच स्वातंत्र्यलढ्यात हिरीरीने भाग घेतला होता.अशाच एका क्रांतिकारकाने भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती दिली. त्यांचे नाव शिरीषकुमार. त्यांचा जन्म २८ डिसेंबर १९२६ रोजी नंदूरबार याठिकाणी झाला. शिरीषकुमार यांचे आई-वडील दोघेही भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभागी होते. त्यांची आई सविताबेन या राष्ट्र सेवा दल या स्थानिक संघटनेच्या अध्यक्षा होत्या, तर वडील पुष्पेंद्रभाई नंदूरबारमधील काँग्रेस कमिटीचे नेते होते. त्यामुळे देशप्रेमाचे वातावरण असलेल्या घरात शिरीषकुमार लहानाचे मोठे होत होते.

महात्मा गांधींनी ९ ऑगस्ट १९४२ ला इंग्रजांना चले जावचा आदेश दिला. त्यानंतर गावोगावी प्रभात फेऱ्या, ब्रिटिशांना इशारे दिले जाऊ लागले. बरोबर महिनाभरानंतर, ९ सप्टेंबर १९४२ ला नंदुरबारमध्ये निघालेल्या प्रभात फेरीत आठवीत शिकत असलेले शिरीषकुमार सहभागी झाले होते. भारत मातेचा जयघोष करीत ही फेरी गावातून फिरत होती. मध्यवर्ती ठिकाणी ती फेरी पोलिसांनी अडवली. शिरीषकुमार यांच्या हातात झेंडा होता. पोलिसांनी ही मिरवणूक विसर्जित करण्याचे आवाहन केले. या बालकाने ते आवाहन झुगारले.

अखेर पोलिसांनी गोळीबार सुरू केला. एका पोलीस अधिकाऱ्याने मिरवणुकीत सहभागी मुलींच्या दिशेने बंदूक रोखली. तेव्हा शिरीषकुमार यांनी सुनावले, गोळी मारायची तर मला मार!. संतापलेल्या पोलीस अधिकाऱ्याच्या बंदुकीतून सुटलेल्या, एक, दोन, तीन गोळ्या शिरीष यांच्या छातीत बसल्या आणि ते जागीच कोसळले. त्यांच्यासोबत पोलिसांच्या गोळीबारात लालदास शहा, धनसुखलाल वाणी, शशिधर केतकर, घनश्यामदास शहा हे अन्य चौघेही शहीद झाले.



सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# भरती परीक्षा पारदर्शक, सुरक्षित करण्यासाठी सूचना आणि अभिप्राय द्या !

## उच्चस्तरीय समिती १६ सप्टेंबरला नागपुरात, नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयात असणार विशेष कक्ष, विद्यार्थी, परीक्षार्थी, पालकांसह सर्व संबंधित घटकांना अभिप्राय पाठविण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीच्या कार्यकक्षेनुसार राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा परीक्षार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक, लोकप्रतिनिधी, नागरिक आणि अन्य संबंधित घटकांकडून परीक्षा पद्धतीतील सुधारणांसाठी सूचना व अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

या अनुषंगाने समितीचे अध्यक्ष व सदस्य बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नियोजन भवन, सदर पोलीस स्टेशनच्या मागे, सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे कामकाजाच्या अनुषंगाने भेट देणार आहेत. त्यापूर्वी नागपूर विभागातील संबंधित घटकांकडून सूचना व अभिप्राय संकलित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हा कक्ष बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजेपासून मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत कार्यरत राहणार आहे. सूचना व अभिप्राय निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांच्याकडे सादर करता येतील. प्रत्यक्ष सूचना निवासी उपजिल्हाधिकारी यांची स्वीय शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे स्वीकारण्यात येतील. तसेच nagpur-examreformstaskforce@maharashtra.gov.in या ई-मेलवरही लेखी अभिप्राय पाठविता येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील विशेष कक्षात प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नसलेल्या नागरिकांनी विहित मुदतीत ई-मेलद्वारे आपले अभिप्राय सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यमान परीक्षा प्रणाली व विविध विभाग, प्राधिकरणे तसेच परीक्षा घेणाऱ्या संस्थांच्या कार्यपद्धतीचा आढावा, परीक्षा अधिक सुरक्षित, निष्पक्ष, पारदर्शक व उमेदवाराभिमुख करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून निकाल प्रक्रियेपर्यंतची सुरक्षा, प्रश्नपत्रिकेचे मॉडरेशन, डिजिटल अथवा मुद्रित वितरण, गोपनीय वाहतूक, परीक्षा केंद्रांचे व्यवस्थापन, प्रतिसाद नोंदणी आणि मूल्यांकन याबाबत सूचना अपेक्षित आहेत.

तसेच बायोमेट्रिक प्रमाणीकरण, प्रवेश नियंत्रण, ऑडिट ट्रेल्स आणि सीसीटीव्ही देखरेख यांसारख्या माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, पेपरफुटी,



गोपनीयतेचा भंग, तोतया उमेदवार, संगनमत आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा गैरवापर रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय व उत्तरदायित्व निश्चित करणे याबाबतही अभिप्राय मागविण्यात आले आहेत. इतर राज्ये अथवा देशांतील यशस्वी व आधुनिक परीक्षा पद्धतींचा अभ्यास, परीक्षा केंद्रांसाठी किमान पायाभूत व सुरक्षा मानके, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस यंत्रणा, शिक्षण विभाग आणि परीक्षा संस्थांमधील समन्वय तसेच उमेदवारांसाठी जलद व पारदर्शक तक्रार निवारण प्रणाली याबाबतही सूचना देता येणार आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त होणाऱ्या सर्व सूचना व अभिप्रायांचे संकलन करून ते शासनाच्या उच्चस्तरीय समितीकडे सादर करण्यात येणार आहेत. समिती या सूचना व शिफारशींचा सखोल अभ्यास करून राज्य शासनाला सर्वसमावेशक अंतिम अहवाल सादर करणार आहे. राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षा परीक्षार्थींच्या भवितव्याशी संबंधित असलेल्या या प्रक्रियेत नागपूर महसूल विभागातील सर्व संबंधित घटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या सूचना व अभिप्राय सादर करावेत, असे आवाहन विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय प्रबोधिनी कविरत्न पुरस्काराने डॉ. किरणताई मोरे-चव्हाण सन्मानित

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**




प्रबोधिनी प्रेरणा फाऊंडेशन, प्रबोधिनी साहित्य मंच आणि महाराष्ट्र साहित्य समूह यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी वर्धा येथील संत गाडगेबाबा स्मारक सभागृह, कृष्णनगर येथे दुसरे राज्यस्तरीय कविसंमेलन व कविरत्न पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी आयोजकांकडून महाराष्ट्रासह इतर राज्यांतून साहित्य क्षेत्रातील मान्यवरांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यामध्ये सालेकसा येथील ज्येष्ठ कवयित्री डॉ. किरणताई मोरे चव्हाण यांची साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत निवड करण्यात आली होती. त्यांना याबाबत निवडपत्रही प्रदान करण्यात आले होते.

साहित्यसेवेसाठी मानाचा समजला जाणारा 'राज्यस्तरीय प्रबोधिनी कविरत्न पुरस्कार' डॉ. किरणताई मोरे चव्हाण यांना कविसंमेलनाचे अध्यक्ष तथा विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष राजेंद्र मुंडे, प्रमुख पाहुणे प्रा. राजकुमार मुसणे, सुरेशराव गणराज भालचंद्र डंभे, अर्चनाताई भोमले, जनार्धन दडगळे, डॉ. विद्याताई राईकवार, मृणालिनी रागीट तसेच वर्धा नगर परिषदेचे अध्यक्ष सुधीरभाऊ पांगुळ यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

पुरस्काराचे स्वरूप शाल, मोमेंटो व प्रमाणपत्र असे होते. यावेळी प्रबोधिनी साहित्य मंचचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत रामटेके, नम्रता रामटेके, आयोजक रंजना आटे, अॅड. विठ्ठल लोणकर, रवी ताकसांडे, हर्षा भुरे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

डॉ. किरणताई मोरे चव्हाण यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्या मैत्रिणी, आप्तपरिवार तसेच साहित्यप्रेमींकडून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# गणपती चित्र रंगवा स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, बालकला अकादमी आणि पंम्की यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवानिमित्त आयोजित 'गणपती चित्र रंगवा' स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत नागपूर शहरातील विविध शाळांमधील सुमारे ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. श्रीमती दादीबाई देशमुख हिंदू मुलींची शाळा, सोमलवार रामदास पेठ, सोमलवार निकालस, टी. ब्रांच मुंडले विद्यालय, सेंट पॉल हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज आणि भाऊजी दप्तरी विद्यालय या शाळांमधील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. याशिवाय नागपुरातील अन्य शाळांमधील विद्यार्थ्यांनीही स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि गणेशोत्सवाच्या माध्यमातून त्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमामागील उद्देश होता. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सुबोध आष्टीकर, सुरेखा वासनिक, कोमल चौधरी, समीक्षा लाखे, हिंदू मुलींच्या शाळेतील सर्व शिक्षक तसेच पंम्कीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्राजक्ता फडणवीस यांचे विशेष सहकार्य लाभले.

# शेतकरी-मजुरांच्या हक्कासाठी आमगावात काँग्रेसचा हुंकार

## किसान काँग्रेसतर्फे अधिकार परिषद व जिल्हा मेळावा, धान उत्पादकांच्या प्रश्नांवर मंथन



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

शेतकरी व शेतमजुरांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आमगाव येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी व किसान काँग्रेसतर्फे शेतकरी-मजूर अधिकार परिषद व जिल्हा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. आमगाव-सालेकसा मार्गावरील साई मंगलम लॉन येथे झालेल्या या मेळाव्यात शेतमालाला योग्य भाव, वाढता उत्पादन खर्च, शेतीसाठी आवश्यक सुविधा, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान आणि शेतमजुरांच्या समस्यांवर चर्चा करण्यात आली.

माजी प्रदेशाध्यक्ष तथा आमदार नानाभाऊ पटोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मेळाव्याला किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पाष्टे, काँग्रेस प्रदेश सचिव पी. जी. कटरे, खासदार प्रतिनिधी दुष्यंत किरसान, माजी आमदार दिलीपभाऊ बनसोड, काँग्रेस जिल्हाध्यक्ष अमरभाऊ वऱ्हाडे आणि किसान काँग्रेस जिल्हाध्यक्ष जितेश राणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गोंदिया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर धानाची शेती केली जाते. मात्र, वाढता उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती आणि शेतीमालाच्या दरातील चढ-उतारामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळावा आणि शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, यासाठी प्रभावी पाठपुरावा करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

शेतकरी व शेतमजुरांच्या हक्कांसाठी संघटितपणे संघर्ष करण्याचा निर्धार परिषदेत करण्यात आला. यावेळी काँग्रेस पदाधिकारी, किसान काँग्रेसचे कार्यकर्ते, जिल्हा परिषद सदस्य, शेतकरी व शेतमजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अनिल कुमार जाधव यांना एमएलसी देण्याची मागणी, मंगल चौरसिया यांची भूपेश बघेल यांच्याशी भेट

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यातील काँग्रेसचे युवा नेते, समाजसेवक तथा सोनिया गांधी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अनिल कुमार जाधव यांना विधानपरिषदेचे सदस्यत्व देण्यात यावे, या मागणीसाठी सोनिया गांधी ब्रिगेडचे राष्ट्रीय संचालक मंगल चौरसिया यांनी छत्तीसगड राज्याचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्या निवासस्थानी प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली.

यावेळी कर्नाटकातील काँग्रेस संघटनात्मक व सामाजिक कार्यात अनिल कुमार जाधव यांच्या योगदानाची माहिती देत त्यांना विधानपरिषदेवर संधी देण्याची मागणी करणारे निवेदनही सादर करण्यात आले.

अनिल कुमार जाधव हे बिदर जिल्ह्यातील काँग्रेसचे सक्रिय युवा नेतृत्व म्हणून कार्यरत असून, सामाजिक प्रश्न तसेच युवकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी ते सातत्याने पुढाकार घेत असल्याचे मंगल चौरसिया यांनी यावेळी सांगितले. युवकांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे भूमिका मांडण्या सोबतच जन सामान्यांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी जाधव यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना स्थानिक पातळीवर चांगला जनाधार मिळाला असल्याचेही त्यांनी नमूद केले. काँग्रेस पक्षाशी सातत्याने जोडून राहून संघटन मजबूत करण्यासाठी तसेच सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या अशा युवा नेतृत्वाला राजकीय प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे.

त्यामुळे अनिल कुमार जाधव यांच्या कार्याचा विचार करून कर्नाटक राज्यातून त्यांना विधानपरिषदेत प्रतिनिधित्वाची संधी द्यावी, अशी मागणी मंगल चौरसिया यांनी केली. या संदर्भात मंगल चौरसिया यांनी काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, कर्नाटकचे मुख्यमंत्री डी.के.शिवकुमार याची भेट घेऊन अनिल कुमार जाधव यांच्या उमेदवारीबाबत चर्चा करण्याची मागणी केली आहे. कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील युवा नेतृत्वाला विधान परिषदेत संधी मिळाल्यास युवक, समाजातील वंचित घटक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे व्यासपीठ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

मंगल चौरसिया यांनी सांगितले की, अनिल कुमार जाधव हे केवळ काँग्रेसचे युवा नेते नसून समाजाच्या विविध प्रश्नांवर सातत्याने काम करणारे कार्यकर्ते आहेत. पक्ष संघटना मजबूत करण्या सोबतच युवकांना संघटित करण्याचे आणि त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन पक्षश्रेष्ठींनी त्यांना विधानपरिषदेत प्रतिनिधित्वाची संधी द्यावी. बिदर जिल्ह्यासह कर्नाटकातील काँग्रेस कार्यकर्ते आणि युवकांमध्ये अनिल कुमार जाधव यांच्याबाबत सकारात्मक वातावरण असून, त्यांच्या सामाजिक व राजकीय कायार्ला व्यापक व्यासपीठ मिळावे, यासाठी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडे ही मागणी करण्यात येत असल्याचे चौरसिया यांनी स्पष्ट केले. अनिल कुमार जाधव यांना एमएलसी पदाची संधी मिळावी, यासाठी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशी पुढील काळातही चर्चा करून पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे मंगल चौरसिया यांनी सांगितले.

## थोडक्यात

### चिंतेश्वर शिवलिंग मंदिरात १५ सप्टेंबर रोजी भव्य महाप्रसादाचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आशीर्वाद नगर, गुरुदेव नगर, संत तुकाराम चौक, बँक ऑफ बडोदा यांच्या बाजूला असलेल्या चिंतेश्वर शिवलिंग मंदिरात दरवर्षीप्रमाणे



यंदाही भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या मंगळवारी १५ सप्टेंबर रोजी, सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत हा महाप्रसादाचा आयोजित करण्यात आला आहे. महाप्रसादाच्या निमित्ताने मंदिरात धार्मिक वातावरण निर्माण होणार असून, भाविकांना भगवान शिवशंकर, शंभू भोलेनाथ यांच्या पिंडीचे दर्शन घेऊन आरती व महाप्रसादाचा लाभ घेता येणार आहे. परिसरातील तसेच आजूबाजूच्या सर्व भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या धार्मिक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन चिंतेश्वर शिवलिंग मंदिर मंडळा च्यावतीने करण्यात आले आहे. चिंतेश्वर शिवलिंग मंदिरात दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या महाप्रसादाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. दरवर्षी जवळपास ८ ते ९ हजार भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात. त्यामुळे यंदाही मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. भाविकांनी शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन, आरती आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असेही मंदिर मंडळाने सांगितले आहे.

या महाप्रसादाच्या आयोजनामागे परिसरातील नागरिक व भाविकांची धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकोपा आणि भक्तिभाव अधिक दृढ करण्याचा उद्देश आहे. भगवान भोलेनाथांच्या आशीवार्दाने आयोजित करण्यात येणाऱ्या या महाप्रसाद सोहळ्यात सर्वांनी सहभागी होऊन प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. दि. १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत चिंतेश्वर शिवलिंग मंदिर येथे होणाऱ्या या भव्य महाप्रसाद व आरती सोहळ्याला सर्व भाविकांनी आवर्जून उपस्थित राहून भगवान भोलेनाथांचे दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन चिंतेश्वर शिवलिंग मंदिर मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. या आयोजनासाठी चिंतेश्वर शिवलिंग मंदिर मंडळाचे अध्यक्ष इंदुबाई बांते यांच्यासह संजय बोरगावकर, मुरलीधर केवतकर, आशाताई मिश्रा, विजय बैसवारे, आशिष सोळंके, दिनेश बांते, सिद्धू कोमजवार, राजुभाऊ काकडे, चंदूभाऊ साळवे, निशिकांत कडू, प्रणव समर्थ, जाधव पेंटर, प्रमोद पाल, वीरेंद्र पाटील, प्रशांत कोहळे आणि प्रशांत वानखेडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

### प्रोजेक्ट अरुणोदय अंतर्गत स्वप्नील डंबारे यांचा शिक्षकभूषण पुरस्काराने गौरव




**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

नगर परिषद बल्लारपूरच्या शिक्षण विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या प्रोजेक्ट अरुणोदय अंतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यात आला. सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात उत्तम कामगिरी केल्याबद्दल पी. एम. श्री गांधी विद्यालय, नगर परिषद बल्लारपूर येथील कंत्राटी क्रीडा शिक्षक स्वप्नील गौतम डंबारे यांना शिक्षकभूषण पुरस्कार प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. नगर परिषदेकडून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा व सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी प्रोजेक्ट अरुणोदय राबविण्यात येत आहे. या उपक्रमात स्वयंस्फूर्तीने योगदान देत शाळेतील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत डंबारे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष अल्का वाढई, उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, मुख्याधिकारी विशाल वाघ, उपमुख्याधिकारी रविंद्र भंडारवार यांच्यासह शिक्षण सभापती प्रियंका थूलकर, नगरसेवक, नगरसेविका व नगर परिषद प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. मान्यवरांनी स्वप्नील डंबारे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कायार्साठी शुभेच्छा दिल्या.

### म्हाळगी नगर परिसरात शिक्षक गौरव समारंभ




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दक्षिण नागपूर परिसरातील शिवाजी पार्क, म्हाळगी नगर येथे शिक्षक दिनाचे औचित्य साधून 'शिक्षक गौरव समारंभ' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजक प्रवीण गवरे हे होते. समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सन्मानाचा सोहळा ठरला.

या कार्यक्रमाला पदवीधर मतदार संघाचे आमदार अभिजीत वंजारी, प्रदेश काँग्रेसचे महासचिव गिरीश पांडव, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ टाकसाळे, माजी प्राचार्य साहेबराव इंगळे, विठ्ठल धोटे, धनराज वलुकार, नरेश बेरड, शिवमहेंद्र काळे यांच्यासह अनेक शिक्षक, शिक्षिका व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रल्हाद भुसारी यांनी केले तर पठाण यांनी आभार प्रदर्शन केले.

### सरदारनी कुलदीप कौर सग्गु याचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कामठी रोडवरील गमदुर रेस्टॉरंटच्या मागे सिद्धार्थ नगर, येथील



रहिवासी सरदारनी कुलदीप कौर सग्गु यांचे वयाच्या ७५ वर्षी ८ सप्टेंबर रोजी, निधन झाले. उद्या बुधवार दि. ९ सप्टेंबर रोजी, त्यांच्या राहते घरी अंतिम दर्शन ३ वाजता. आणि दुपारी ४ वाजता. वैशाली घाटावर अंतिम संस्कार करण्यात येईल. त्यांच्या पश्चात पती बलविंदर सिंग सग्गु व बराच मोठा आप्त परिवार आहे.

थोडक्यात

## आदिवासी भागातील विकास कामांची राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी केली प्रत्यक्ष पाहणी



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी तालुक्यातील कुंवारा भिवसेन येथे ७ सप्टेंबरला येथील स्थानिक नागरिकांना पट्टे वाटपाच्या संदर्भात राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. यावेळी येथील प्राचीन मंदिरात जाऊन आदिवासी समाजाचे आराध्य दैवत भीमालपेन यांचे दर्शन घेऊन सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. तसेच विविध विकासकामांच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन कामांचा आढावा घेतला. आणि आवश्यक त्या सूचना संबंधितांना दिल्या. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन, सार्वजनिक बांधकाम विभाग उपविभागीय अभियंता पोकळे, तहसीलदार सुरेश वाघचौरे, गटविकास अधिकारी जाधव तसेच संबंधित विभागाचे अधिकारी तसेच गावकरी उपस्थित होते.

## विश्वशांतीची साधना सामुदायिक प्रार्थना : ह.भ.प. ज्ञानेश्वर इंगोले



**दै. सिंहवाणी वृत्त, पुसद**

भौतिक साधनाने सुख मिळेल पण समाधान नाही,समाधानच नव्हे तर जनता जनार्दन समजून भरीव कार्य केल्याने अथवा संतांच्या शिकवणीप्रमाणे वागल्यास आत्मसमाधान लाभते या धकाधकीच्या काळात भिन्नतेत एकता निर्माण सर्वांचे कल्याण होण्यासाठी सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना सर्व जाती, धर्म,पंथाचा समन्वय घडविण्याचे प्रभावी माध्यम असून विश्वशांतीची साधना आहे असे प्रतिपादन ह.भ.प.ज्ञानेश्वर इंगोले यांनी सामुदायिक प्रार्थनेत बंजारा कॉलनी पुसद येथे केले. गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने पुसद तालुक्यात विविध ठिकाणी ५१ सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून यावेळी श्रीमती शांताबाई राठोड यांच्या निवासस्थानी सबके लिये खुला है मंदिर यह हमारा अश्या हरी ओम मंदिर बंजारा कॉलनी येथे सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली.यावेळी ताराचंद जाधव,ह.भ.प.सुधाकर कपटे, विठ्ठल जांभूळकर,कोपरा येथील गजानन चव्हाण, कासार समाजभूषण मोहन नागपूरकर, तालुका सेवाधिकारी शिवशंकर नागरे, मंडळाचे अध्यक्ष गणेश धर्माळे प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन करून स्वर्गीय नत्थुराम राठोड व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

स्मिता धर्माळे यांच्या आदेशावरून शिस्तबद्ध सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली यावेळी प्रार्थनेचे महत्व विषद करतांना इंगोले पुढे म्हणाले की ईश्वर आराधना करण्याची अनेक साधने आहेत सामाजिक सत्कमार्तून दुसऱ्यासाठी कार्य करणे हे महान कार्य आहे गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर तर्फे अनेक लोकोपयोगी कार्य केले जाते त्यांच्या कार्याची ही पावती असून ही सामुदायिक प्रार्थना गावागावात, नगरानगरात चैतन्य निर्माण करेल मंडळाचा संकल्प गुरुदेव पूर्ण करतील यात शंकाच नाही. यावेळी त्यांनी आजची विदारक परिस्थिती व एकांगी, स्वार्थी जीवनावर राष्ट्रसंतांच्या विचारांनी प्रहार करत महत्त्वपूर्ण विषयावर ग्रामगीता ग्रंथाच्या आधारे मार्गदर्शन केले. त्यानंतर भजनांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला हार्मोनियम यशवंत भगत,शिवलिंग अण्णा पटवे तबला अनिल अस्वार, किसन गरडे खंजिरी सुरेश कदम, प्रा. आकाश ताविडे यांनी साथसंगत यशवंत देशमुख, कैलास मस्के, पुंडलिक भालेराव, पंजाब गडदे,बाबासाहेब वाघमारे, श्यामराव देशमाने, विष्णू राठोड, गजानन गव्हाणकर,माधव पवार, सागर केळकर, अमोल पवार, देवेश किन्हेकर,रमेश चव्हाण, भीमराव वानखेडे,सतीश चव्हाण, माधव गव्हाणे,दिगंबर चव्हाण, तानाजी गडधने, सुरज केळकर, मुंगशी चव्हाण महिला प्रतिनिधी कमल गडदे, मुक्ता काळबांडे, कुसुम इंगोले,देवश्री काळबांडे, रंजना किन्हेकर यांनी केली. अल्पोपहार,आरती,राष्ट्रवंदना, जयघोषाने कार्यक्रमाची सांगता झाली यावेळी असंख्य स्त्री पुरूष आबालवृद्ध मोठया संख्येने उपस्थित होते.

## घोटमुंढरी जि प शाळेत सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रकट दिन साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

जिल्हा परिषद आदर्श शाळा घोटमुंढरी येथे सर्वज्ञ श्री.चक्रधर स्वामी यांचा प्रगट दीन कार्यक्रम उपस्थित मान्यवरांचे हस्ते साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उदय पांडे, उपाध्यक्ष मंगलसिंग देवतारे, ग्रामपंचायत सदस्य शंकर पटले, शिक्षिका परिहार, खुरसुंगे, मोनाली पटले, ढोरे,बागडे,आरती, प्रियंका श्रावणकर, आम्रपाली घरडे, कीर्ती पटले व सर्व विद्यार्थी उपस्थितीत होते. मुख्याध्यापक धारगावे यांनी या दिनाचे औचित्य साधून श्री.चक्रधर यांच्या कार्याची महती सांगून, विद्यार्थ्यांना ध्यान व शैक्षणिक महत्व पटवून देऊन मार्गदर्शन केले.मनोज वंजारी यांनी आभार प्रदर्शन करीत कार्यक्रमाच्या समारोप केला.

# कचरा संकलन कंत्राटातील आणखी एक घोटाळा आ. विकास ठाकरे यांनी केला उघड

### सुरक्षा रक्षकांच्या नकळत बँक खाती उघडून व्यवहार केल्याचा आरोप, निर्धारित वेतनापेक्षा दरमहा १०,१०० कमी देऊन आर्थिक शोषण

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिकेची कचरा संकलन कंपनी एजी एन्व्हायरो इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड, तिच्याशी संबंधित सुरक्षा एजन्सी आणि महानगरपालिकेतील काही अधिकाऱ्यांच्या संगनमतातून झालेला आणखी एक गंभीर घोटाळा पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी उघडकीस आणला आहे. सुरक्षा रक्षकांच्या नकळत त्यांच्या नावाने बँक खाती उघडून त्या खात्यांमधून व्यवहार करण्यात आल्याचा, तसेच निर्धारित वेतनापेक्षा प्रत्येक सुरक्षा रक्षकाला दरमहा १०,१०० कमी देण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे.

नागपूर शहरातील कचऱ्याचे संकलन, हस्तांतरण आणि वाहतूक करण्यासाठी कंत्राटदार कंपन्यांमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नागपूर महानगरपालिका ही प्रधान नियोक्ता आहे. त्यामुळे कंत्राटदार आणि उपकंत्राटदारांकडून कामगार कायदे, वेतनविषयक नियम तसेच कंत्राटातील अटी व शर्तींचे पालन होत आहे किंवा नाही, याची खातरजमा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर असल्याचे आमदार ठाकरे यांनी म्हटले आहे.

नोव्हेंबर २०१९ मध्ये कचरा संकलनाचे कंत्राट सुरू झाल्यानंतर एजी एन्व्हायरोने आपल्या अखत्यारीतील पाच झोनमधील कचरा हस्तांतरण केंद्रे आणि वाहनतळांवर सुरक्षा रक्षक पुरविण्याचे काम आर्मर सिक्युरिटी इंडिया लिमिटेडला दिले होते. एजी एन्व्हायरो आणि संबंधित सुरक्षा एजन्सीवर लागू कामगार कायद्यांसह नागपूर महानगरपालिकेच्या कंत्राटातील सर्व अटी व शर्तींचे काटेकोर पालन करणे बंधनकारक होते.

**१७ सुरक्षा रक्षकांच्या नावाने परस्पर बँक खाती**

पीडित सुरक्षा रक्षकांच्या एका शिष्टमंडळाने आमदार विकास ठाकरे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे लेखी तक्रार सादर केली. या तक्रारीनंतर करण्यात आलेल्या प्राथमिक तपासणीत आर्मर सिक्युरिटीने १७ सुरक्षा रक्षकांना कोणतीही पूर्वकल्पना न देता किंवा त्यांची अधिकृत संमती न घेता सीताबर्डी येथील सूर्योदय स्मॉल फायनान्स बँकेत त्यांच्या नावाने खाती उघडल्याचे समोर आले.

नोव्हेंबर २०१९ पासून या खात्यांमधून संबंधित कर्मचाऱ्यांच्या नकळत विविध व्यवहार करण्यात आल्याचा आरोप सुरक्षा रक्षकांनी केला आहे. कर्मचाऱ्यांच्या नावाने खाती उघडण्यासाठी कोणती कागदपत्रे वापरण्यात आली, खात्यांचे नियंत्रण कोणाकडे होते आणि



त्यामधून झालेल्या आर्थिक व्यवहारांचा लाभ नेमका कोणाला मिळाला, याची स्वतंत्र व सखोल चौकशी करण्याची मागणी आमदार ठाकरे यांनी केली आहे.

**कामगार कायद्यांच्या पालनाबाबत खोटी कागदपत्रे सादर केल्याचा संशय**

गेल्या जवळपास सात वर्षांपासून एजी एन्व्हायरोने कामगार कायदे आणि कंत्राटातील अटींचे पालन केल्याची खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती नागपूर महानगरपालिकेला सादर केल्याचा आरोप आहे. महानगरपालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पडताळणी न करता दर महिन्याला या माहितीला मान्यता दिल्यामुळे त्यांच्या भूमिकेवरही गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांचे विवरण, वेतन नोंदवही, उपस्थितीपत्रक, वेतन वितरणाचा तपशील, ईपीएफ व ईएसआयसी अंशदान आणि कंत्राटदाराने महानगरपालिकेला सादर केलेली मासिक देयके यांची परस्पर पडताळणी केल्यास या प्रकरणाची संपूर्ण व्याप्ती उघड होऊ शकते, असे आमदार ठाकरे यांनी नमूद केले.

**२५,६०० ऐवजी केवळ १५,५०० वेतन**

या प्रकरणात वेतनासंदभार्तील आणखी एक गंभीर आर्थिक अनियमितता समोर आली आहे. कंत्राटातील अटी आणि निर्धारित दरानुसार प्रत्येक सुरक्षा रक्षकाला दरमहा २५,६०० वेतन देणे आवश्यक होते. प्रत्यक्षात मात्र त्यांना केवळ १५,५०० प्रतिमाह दिले जात होते.

अशा प्रकारे प्रत्येक सुरक्षा रक्षकाच्या वेतनातील फर १०,१०० प्रतिमाह रक्कम कुठे गेली, याचा कोणताही समाधानकारक हिशेब उपलब्ध नसल्याचा आरोप आहे. १७ सुरक्षा रक्षकांच्या बाबतीत ही रक्कम दरमहा १,७१,७००, तर एका वर्षात २०,६०,४०० इतकी होते. त्यामुळे संपूर्ण कंत्राट कालावधीतील आर्थिक व्यवहारांचे विशेष लेखापरीक्षण करण्याची आवश्यकता असल्याचे आमदार ठाकरे यांनी म्हटले आहे.

**आवाज उठविल्यानंतर वेतन रोखल्याचा आरोप**

या गैरप्रकारांविरोधात सुमारे १७ सुरक्षा रक्षकांनी मे २०२६ मध्ये आवाज उठविला. त्यानंतर संबंधित सुरक्षा एजन्सीने त्यांचे वेतन रोखल्याचा आरोप आहे. वेतन न मिळाल्यामुळे या कर्मचाऱ्यांनी जून २०२६ पासून कामावर जाणे बंद केले.

कामगारांनी आपल्या कायदेशीर हक्कांसाठी आवाज उठविल्यानंतर त्यांचे वेतन रोखणे ही गंभीर आणि अन्यायकारक कारवाई असून, पीडित सुरक्षा रक्षकांचे थकीत वेतन तसेच त्यांना देय असलेली संपूर्ण फरकाची रक्कम व्याजासह तातडीने देण्यात यावी, अशी मागणी आमदार ठाकरे यांनी केली आहे.

**नाव बदलले; मालकी मात्र संबंधित व्यक्तींकडेच?**

सुरक्षा रक्षकांनी तक्रार केल्यानंतर एजी एन्व्हायरोने नागपूर महानगरपालिकेतील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने एलिट सिक्युरिटास प्रायव्हेट लिमिटेड या दुसऱ्या एजन्सीचे सुरक्षा रक्षक नियुक्त केल्याचा आरोप आहे. मात्र, ही नवी सुरक्षा एजन्सी आर्मर सिक्युरिटी इंडिया लिमिटेडच्या मालकांशी संबंधित व्यक्तींच्या मालकीची असल्याचे सुरक्षा रक्षकांनी आमदार ठाकरे यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

त्यामुळे केवळ कंपनीचे नाव बदलून पूर्वीचीच व्यवस्था सुरू ठेवण्यात आली का, तसेच नव्या एजन्सीची नियुक्ती करताना निविदा प्रक्रिया, पात्रता आणि महानगरपालिकेची पूर्वपरवानगी यांचे पालन करण्यात आले का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**एजी एन्व्हायरोचे कंत्राट रद्द करण्याची मागणी**

आमदार विकास ठाकरे यांनी या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. एजी एन्व्हायरोचे कंत्राट तातडीने रद्द करावे, संबंधित सुरक्षा रक्षकांचे थकीत वेतन आणि वेतनातील फरकाची संपूर्ण रक्कम अदा करावी तसेच दोषी अधिकारी व कंपन्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

नोव्हेंबर २०१९ पासून एजी एन्व्हायरो आणि बीव्हीजी इंडिया लिमिटेड या दोन्ही कचरा संकलन कंपन्यांच्या कामकाजातील अनेक कथित गैरप्रकार लोकप्रतिनिधी, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी उघडकीस आणले आहेत. या तक्रारींची गंभीर दखल घेत नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने जानेवारी २०२२ मध्ये दोन्ही वादग्रस्त कंपन्यांचे कंत्राट रद्द करण्याचा ठराव मंजूर केला होता. करिता कंपनी, सुरक्षा एजन्सी, बँक आणि दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध एफआयआर नोंदवा अशी मागणीही त्यांनी यावेळी केली आहे.

## सन्मित्र सभेचा स्थापना दिवस सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रउभारणीसाठी अहंकाराचा त्याग करण्याची प्रेरणा भगवान कृष्णाच्या शिकवणीतून मिळते. सत्ता प्राप्त केल्यानंतरही अलिप्तता टिकवून ठेवण्याची शिकवण कृष्णाच्या जीवनातून मिळते. प्रख्यात वक्ते आणि संस्कार भारतीचे अखिल भारतीय महासचिव, आशुतोष अडोनी यांनी सन्मित्र सभेच्या स्थापना दिन सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून हे विचार व्यक्त केले. त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता, "कृष्णाची नीतिमूल्ये - सद्यस्थितीत."

पौराणिक उद्धरणांच्या आधारे भगवान कृष्णाच्या लीलांचे विश्लेषण करताना ते म्हणाले की, कृष्णाचे जीवन संकटांनी वेढलेले होते. त्यामुळे, त्यांच्या प्रत्येक लीलेत एक संदेश दडलेला आहे. गोवर्धन पूजा परंपरांमध्ये वेळेवर बदल करण्याची गरज अधोरेखित करते, तर जरासंधाचे वध स्त्रीमुक्ती आणि सक्षमीकरणाचा



मार्ग दाखवते.

लोककल्याणासाठी मथुरेतून द्वारकेला पळून जाण्यास आणि रणछोड होण्यास त्यांनी संकोच केला नाही. छत्रपती शिवाजींचा संघर्ष कृष्णाची मुत्सद्देगिरी दर्शवतो, तर वीर सावरकरांचा राष्ट्रासाठीचा संघर्ष कृष्णाची दृढता दर्शवतो. कलम ३७० रद्द करण्यासाठी अवलंबलेले सध्याचे धोरण, बालाकोट ऑपरेशन आणि ऑपरेशन सिंदूर हे कृष्णाच्या तत्त्वांचे प्रतिबिंब आहेत. ते म्हणाले की, भगवान कृष्णाच्या जीवनाकडे साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. त्यांची तत्त्वे सामाजिक प्रगतीच्या कल्पनेला मूर्त रूप देतात. डॉ. हेडगेवार रक्तपेढी यांच्या आनंदराव भिडे सभागृहात आयोजित या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे आशुतोष अडोनी यांनी दीपप्रज्वलन करून केली. उज्वला अंधारे यांनी सन्मित्र प्रार्थना सादर केली. सन्मित्र सभेचे अध्यक्ष अनिल शेंडे यांनी सभेच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. आपला परिचय देताना श्री. शेंडे यांनी सभेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी सभेच्या सदस्यांना आणि समाजातील सुजाण लोकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी त्यांनी अकरा हजार रुपयांच्या अनुदानाची घोषणा केली.

या वार्षिक कार्यक्रमात, लग्नाची ५० वर्षे पूर्ण केलेल्या डॉ. सदाशिव आणि अश्विनी जोशी या दांपत्याचा, तसेच वयाची ६० आणि ७५ वर्षे पूर्ण केलेल्या शालिनी गोरले, विनोद जोशी, चंदूजी भगत राम मातडे, अरुण केदार, जयश्री प्रभू देशपांडे, शुभारंभ परांजपे या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्ष अनिल शेंडे यांनी या कार्यक्रमात विशेषरित्या उपस्थित असलेले ज्येष्ठ समाजसेवक, आशुतोष अडोनी यांचे वडील वसंतराव अडोनी यांचा सत्कार केला. कार्यकारी सदस्य अरुण केदार यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. सभेच्या सचिव वृषाली शिलेदार यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. डॉ. उज्वला अंधारे यांनी सादर केलेल्या 'वंदे मातरम'ने कार्यक्रमाची सांगता झाली.

## युवाशक्तीचा भाजपामध्ये वाढता विश्वास!



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

नागपूर येथे सावनेर मतदारसंघातील अनेक युवकांनी भाजपा युवा मोर्चा नागपूर जिल्हा ग्रामीण (काटोल) मध्ये उत्साहात प्रवेश केला. भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनोहर भाऊ कुंभारे व सावनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ.आशिष देशमुख साहेब यांच्या हस्ते योगेश जालंधर, हरीश नायडू यांच्यासह अनेक युवकांनी भाजपा परिवारात प्रवेश केला. भाजपा परिवारात सहभागी झालेल्या सर्व युवा सहकाऱ्यांचे मनःपूर्वक स्वागत व हार्दिक अभिनंदन करत नागपुर जिल्हा ग्रामीणमधे भारतीय जनता पक्ष,भारतीय जनता पक्ष युवा मोर्चा याचा वाढत्या प्रभावामुळे यवकांचा कल भारतीय जनता पक्षाकडे वळू लागल्याने पुढे होऊ घातलेल्या निवडणुकीत याचा नक्कीच लाभ मिळणार असल्याचे चित्र आहे. यावेळी महामंत्री आदर्श पटले, रामरावजी मोवाडे, युवा मोर्चा जिल्हा महामंत्री सारंगजी दळवी, शीतलजी सवाईतुल, उपाध्यक्ष प्रशांतजी कश्यप यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते तसेच अनिकेत कैलास अंतुरकर जिल्हाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा नागपूर जिल्हा ग्रामीण (काटोल) प्रामुख्याने उपस्थित होते.

# सनातन विचार म्हणजे केवळ परंपरा नव्हे, तर जीवनमूल्यांचा स्वीकार : मकरंदबुवा हरदास

### सनातन सांस्कृतिक, कला व क्रीडा परिषदेचे रेशीमबागेत थाटात उद्घाटन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आधुनिक तंत्रज्ञान, बदलती जीवनशैली आणि जागतिकीकरणामुळे जग झपाट्याने बदलत आहे. या बदलांच्या प्रवाहात आपल्या संस्कृतीची मूल्ये, कुटुंबव्यवस्था आणि नैतिकतेची जपणूक करणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. सनातन विचार म्हणजे केवळ परंपरा नव्हे, तर संयम, सहिष्णुता आणि 'वसुधैव कुटुंबकम्' यांसारख्या जीवनमूल्यांचा स्वीकार होय, असे प्रतिपादन प्रसिद्ध



प्रवचनकार मकरंदबुवा हरदास यांनी केले.सनातन सांस्कृतिक, कला व क्रीडा परिषदेचा उद्घाटन सोहळा रेशीमबाग येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी ते बोलत होते.

भारतीय संस्कृतीने हजारो वर्षांपासून 'सर्वे भवन्तु सुखिनः' हा व्यापक मानवकल्याणाचा विचार जगाला दिला आहे. आजच्या तणावपूर्ण आणि स्पर्धात्मक वातावरणात या मूल्यांची गरज अधिक प्रकर्षाने जाणवत आहे. मुलांना केवळ आधुनिक शिक्षण देणे पुरेसे नसून, त्यांच्या मनात संस्कार, संवेदनशीलता, कर्तव्यभावना आणि आपल्या संस्कृती व मातीशी जोडलेपण निर्माण करणे आवश्यक आहे, असेही मकरंदबुवा हरदास यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर सामूहिक रुद्राभिषेकाचे आयोजन करण्यात आले. तसेच संस्कार भारतीच्या संयुक्त विद्यमाने कृष्ण रूप सज्जा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत तीन गटांमध्ये तब्बल ८३ मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यानंतर 'महाभारतातील श्रीकृष्ण' या विषयावर मकरंदबुवा हरदास यांचे विशेष व्याख्यान झाले. श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्त्वातील नेतृत्व, कर्तव्य, नीती आणि जीवनदृष्टी यांचा संदर्भ देत त्यांनी भारतीय संस्कृतीतील मूल्यांचे महत्त्व उपस्थितांसमोर मांडले.

कार्यक्रमाला संस्कार भारती विदर्भ प्रांत अध्यक्ष कांचन गडकरी, नगरसेविका मानसी नितीन सिमले, सुप्रसिद्ध उद्योजक जयंत खळतकर, सक्षमचे डॉ. मिलिंद हरदास, भाग संघचालक अशोक बुजोणे, किशोरजी धाराशिवकर, सुनीलजी काशीकर, प्रकाश देशपांडे, ॲड. रमण सेनाड, राजनजी पाठक तसेच विदर्भ प्रांत सहमंत्री गजानन रानडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी साहित्य परिषदेच्या उपाध्यक्षपदि नियुक्ती झाल्याबद्दल ज्येष्ठ साहित्यिक प्रकाश एदलबादकर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निशांत अग्निहोत्री यांनी केले. सूत्रसंचालन अभिजित मुळे यांनी, तर आभार प्रदर्शन सुधीर सांगोळे यांनी केले. भारतीय संस्कृती, कला, क्रीडा आणि संस्कारांच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने परिषदेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# अमृता फडणवीस यांच्या हस्ते १०० विद्यार्थिनींना सायकल वाटप

## आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून गजानन निवासस्थानी उपक्रम




**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**
महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या प्राचीन शिवलिंगाच्या जीर्णोद्धार कार्यक्रमासाठी चंद्रपूर दौऱ्यावर आलेल्या अमृता देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १०० शाळकरी विद्यार्थिनींना सायकलींचे वितरण करण्यात आले. आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने गजानन निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.
शाळेत जाणाऱ्या विद्यार्थिनींचा प्रवास सुलभ व्हावा आणि आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत, या उद्देशाने सायकल वाटपाचा हा उपक्रम राबविण्यात आला. अमृता फडणवीस यांच्या हस्ते सायकली मिळाल्यानंतर विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला.
यावेळी अमृता फडणवीस यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व सांगितले. मुलींनी शिक्षणाला प्राधान्य देत आत्मविश्वासाने पुढे जावे आणि आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करावा, असे आवाहन त्यांनी केले.
यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले, चंद्रपूरच्या मुलींमध्ये गुणवत्ता आणि क्षमता आहे. मात्र अनेक विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी प्रवासाच्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्यांचा शाळेपर्यंतचा प्रवास सुलभ व्हावा आणि शिक्षणाची वाट अधिक सोपी व्हावी, यासाठी सायकल वाटपाचा उपक्रम हाती घेतला आहे. मुली शिकल्या तर कुटुंब आणि समाजाची प्रगती निश्चित होते. त्यामुळे चंद्रपूरमधील प्रत्येक मुलीला शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहू. असे ते यावेळी म्हणाले.
या कार्यक्रमाला कल्याणी किशोर जोरगेवार यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थीनी व पालक उपस्थित होते.

थोडक्यात

## पोरवाल कॉलेजचे बुद्धिबळपटू जिल्हास्तरावर!



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**
येथील स्थानिक एस के पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनि तालुका स्तरीय बुद्धिबळ बाजी मारत जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळविला. क्रीडा व युवक संचालनालय पुणे अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा ही दिनांक ७/९/२०२६ ला मेरी पोस्ट पिन अकॅडमी स्कूल खसाळा मसाळा कामठी रोड येथे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये एकूण १६ विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी विविध वयोगटांमध्ये भाग घेतला होता. यामध्ये एस के पोरवाल कॉलेजची विद्यार्थिनी रुणाली नागपुरे वयोगट १९ मुली व यथार्थ मेश्राम वयोगट १९ मुले यांनी पाचही राऊंड्सला क्लियर करत आपले स्थान जिल्हास्तराकरिता प्राप्त केले. या विद्यार्थ्यांच्या यशस्वी प्रदर्शनासाठी कॉलेजच्या प्रा.डॉ मल्लिका नागपुरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले तसेच कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर स्वप्नील दाहात सर व उपप्राचार्य व्ही बी वंजारी सर तसेच पर्यवेक्षक नरेंद्र मेंढे सर व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## पीएम श्री जि.प. उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे विद्यार्थ्यांचा भात लावणीचा आगळा उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दहेगाव येथे विद्यार्थ्यांना शेतीपूरक अनुभवात्मक शिक्षण देण्यासाठी प्रत्यक्ष शेतात भात लावणी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी चिखलयुक्त शेतात उतरून हाताने भाताची रोपे लावण्याचा अनुभव घेतला. शेतकऱ्यांचे कष्ट, भात पिकाची प्रक्रिया आणि अन्नाचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजावे हा यामागील मुख्य उद्देश होता. या उपक्रमाचे नेतृत्व शाळेचे मुख्याध्यापक वासुदेव भुते यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षकवृंद सुधीर कांबळे, सुधीर खंडाईत, राजेश रोहाड, सुजाता बोदेले,कु. प्रज्ञा रामटेके, संगीता कारेमोरे, कु.ज्योती आंबिलढुके, उमेश उके व पुष्पलता उके, सौ. रंजना उके,यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व स्वतः शेतात उतरून लावणी कशी करावी हे प्रात्यक्षिक करून दाखवले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. पुस्तकातील धडे शेतात प्रत्यक्ष अनुभवायला मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक आणि संस्कारक्षम ठरला.

## कोल पाईप कन्व्हेअर वे प्रकल्प कमिशनिंग कामगारांचे कामबंद आंदोलन

### अल्टाटेक इंजिनिअरिंग कंपनीविरुद्ध पुकारला एल्गार



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
वीज केंद्रात कोळसा वाहून नेणाऱ्या कोट्यवधींच्या प्रकल्पात कार्यरत असलेल्या कमिशनिंग कामगारांनी नियमित वेतन आणि किमान वेतन व इतर भत्त्यांच्या मागणीसाठी ८ सप्टेंबर रोजी कामबंद आंदोलन पुकारले त्यामूळे काही काळ कोळसा वाहतूक करणारी पाईप कन्व्हेअर कोल वे यंत्रणा ठप्प पडली व एकच खळबळ उडाली. खापरखेडा व कोराडी औष्णिक वीज केंद्रात लागणारा कोळसा जवळच्या कोळसा खाणीतून आणण्यासाठी जवळपास ४५० कोटी रुपये खर्चून कोल पाईप कन्व्हेअर वे प्रकल्प उभारण्यात आला आहे नोएडा येथील इस्जेक हेवी इंजिनिअरिंग लिमिटेड कंपनीला या प्रकल्पाचे कंत्राट देण्यात आले सध्या या प्रकल्पाचे काम पूर्णत्वास आले असून कमिशनिंगचे काम सुरू आहे. इस्जेक हेवी इंजिनिअरिंग लिमिटेड कंपनीने कमिशनिंगचे काम अल्टाटेक इंजिनिअरिंग या सब-कंत्राटदार कंपनीला दिले आहे सदर कंपनीत जवळपास १६० कमिशनिंग कामगार कार्यरत आहे मात्र मागील अनेक महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात शोषण सुरू असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे.
कामगार कायदा १९४८ नुसार कामगारांना किमान वेतन व इतर भत्ते नियमानुसार देणे बंधनकारक आहे मात्र अल्टाटेक इंजिनिअरिंग कंपनीने सर्व नियम धाब्यावर बसवून कमी पगार देऊन कमिशनिंग कामगारांची बोळवण करत आहे शिवाय नियमित वेतन खात्यावर जमा होत नसल्याने कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे. यासंदर्भात व अल्ट्राटेक इंजिनिअरिंग कंपनीचे साईट इंचार्ज शेखर शिवारे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे प्रस्तुत प्रतिनिधीला दिली. कमिशनिंग कामगारांच्या आंदोलनामुळे प्रकल्पाचे काम ठप्प झाल्याची माहिती मिळताच इस्जेक हेवी इंजिनिअरिंगचे संबंधित अधिकारी मनीष सिंग आंदोलन स्थळी दाखल झाले यावेळी थकीत वेतन लवकरात लवकर बँक खात्यात जमा करण्याचे आश्वासन दिले त्यामूळे तूर्तास कामगारांनी आंदोलन मागे घेतले मात्र किमान वेतन व इतर भत्ताचा मुद्दा अजूनही कायम आहे.

## जुगार अड्डयावर नरखेड पोलिसांचा छापा, सात जणांना अटक

### २ हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त, महाराष्ट्र जुगार अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल, गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड शहरात सुरू असलेल्या जुगार अड्डयावर नरखेड पोलिसांनी धाड टाकून जुगार खेळणाऱ्या सात जणांना ताब्यात घेतले. पोलिसांनी घटनास्थळावरून रोख रकमेसह जुगाराचे साहित्य असा एकूण २ हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे शहरात सुरू असलेल्या अवैध जुगाराच्या प्रकारांना चाप बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.
सोमवारी (७ सप्टेंबर) नरखेड पोलिसांना मौजा नरखेड येथे काही जण जुगार खेळत असल्याची गुप्त माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी संबंधित ठिकाणी अचानक धाड टाकली. पोलिसांची कारवाई होताच जुगार खेळणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली. यावेळी पोलिसांनी राजू भार्गवराव डवरे (वय ६३), कबीर रसूल शेख (वय ८२), मुन्ना रतनलाल रॉय (वय ६५), सुनील टीकाराम राऊत (वय ५५), भारत मधुकर अरमरकर (वय ४५), नरखेड, तसेच राजेश वासुदेव निंबाळकर (वय ५५, रा. काटोल) आणि जयपाल रामसिंग राठोड (वय ५४, रा. बेलोना) यांना पकडले. पोलिसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते, रोख रक्कम ३०० रुपये तसेच कॅट बॉक्स रेड कंपनीचे ७ नग, किंमत २ हजार ३१० रुपये, असा एकूण २ हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.
या प्रकरणी जुगार खेळणाऱ्या आरोपींविरुद्ध कलम ४ व ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नरखेड शहर व परिसरात अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून सुरू असलेल्या कारवाईचा हा एक भाग मानला जात आहे.
जुगारासह इतर अवैध व्यवसायांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारल्याने अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. सार्वजनिक ठिकाणी अथवा आडोशाला सुरू असलेल्या जुगाराच्या अड्डयांवर पोलिसांनी अधिक कडक कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## नेहरू नगर झोनचे सहाय्यक आयुक्त यांची विभागीय चौकशी करावी, झोन सभापती सीमा ढोमणे यांची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर महानगरपालिकेच्या नेहरू नगर झोन क्र. ५ मध्ये प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, झोन क्र. ५ च्या सहाय्यक आयुक्तांच्या कामकाजाची विभागीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी झोन सभापती सौ. सीमा ढोमणे यांनी केली आहे.
वर्ष २०२६-२७ च्या झोन बजेटमध्ये मागील आर्थिक वर्ष २०२५-२६ चे देयक दायित्व तब्बल ४ कोटी ६४ लक्ष १३ हजार दाखविण्यात आले आहे. मात्र, सहाय्यक आयुक्त, झोन क्र. ५ यांनी सभापतींच्या समक्ष आतापर्यंत केवळ सुमारे १ कोटी ५० लक्ष रुपयांचीच देयके सादर केली आहेत. मात्र ३ कोटींचे कामाचे विवरण सह बिलाचा हिशोबही देण्यात आला नाही. असा आरोप सभापती सीमा ढोमणे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केला आहे.
याबाबत सभापतींनी सहाय्यक आयुक्तांकडे वारंवार विचारणा केली असून, लेखी पत्रव्यवहार देखील केला आहे . तसेच या दायित्वातील तफावतीबाबत स्पष्टीकरण मागितले आहे. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक व स्पष्ट माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप सीमा ढोमणे यांनी केला आहे. त्यामुळे ४ कोटी ६४ लक्ष १३ हजारांचे दाखविलेले दायित्व आणि प्रत्यक्ष सादर केलेली देयके यामध्ये एवढी मोठी तफावत का आहे, याबाबत संशय निर्माण झाला असून या प्रकरणात मोठा आर्थिक घोळ असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही सीमा ढोमणे यांनी म्हटले आहे. तसेच, आगामी गणेश विसर्जनासाठी कृत्रिम विसर्जन टॅंक उभारण्याच्या नियोजनाबाबत झोन समितीची बैठक घेऊन लोकप्रतिनिधींशी चर्चा करण्याची मागणी सभापतींनी वारंवार केली होती. मात्र, कोणतीही चर्चा किंवा झोन समितीची बैठक न घेता २१ लक्ष ९६ हजारांची निविदा काढण्यात आली, असा आरोपही त्यांनी केला आहे.
झोनमधील विकासकामे, देयक दायित्व, निविदा प्रक्रिया तसेच नागरिकांच्या दैनंदिन समस्यांबाबत लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता निर्णय घेतले जात असल्यामुळे जनतेचे दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, असे सीमा ढोमणे यांनी सांगितले. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व सखोल विभागीय चौकशी करून मागील आर्थिक वर्षातील ४ कोटी ६४ लक्ष १३ हजारांच्या देयक दायित्वाची तपासणी करावी, प्रत्यक्ष देयके व दाखविलेले दायित्व यातील तफावत स्पष्ट करावी तसेच कृत्रिम विसर्जन टॅंकच्या २१ लक्ष ९६ हजारांच्या निविदेची प्रक्रिया तपासावी, अशी मागणी झोन सभापती सीमा ढोमणे यांनी नागपूर महानगरपालिका आयुक्तांकडे केली आहे.

## मनुस्मृतीच्या निषेधार्थ महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्यावतीने संविधान सन्मान यात्रा आज




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्यावतीने मनुस्मृतीच्या निषेधार्थ संविधान सन्मान यात्रा आयोजित करण्यात आली आहे. बुधवार, दिनांक ९ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज दादा मोरे तसेच प्रदेश सहप्रभारी नवज्योत सिंग संधू जी यांच्या प्रमुख उपस्थितीत ही यात्रा एनआयटी कर्मचारी सांस्कृतिक भवन, एस. डी. हॉस्पिटलसमोर, ग्रेट नाग रोड, नागपूर येथून प्रारंभ होऊन आरएसएस कार्यालय, हेडगेवार स्मृती भवन येथे पोहोचणार आहे. या यात्रेमध्ये महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

## पोळ्यापूर्वी भिवापूर पोलिसांचा दणका!

### ३१ जणांना चार दिवस भिवापूर हद्दीत 'नो एंट्री', अवैध दारू, मटका-जुगाराच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची प्रतिबंधात्मक कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
बैल व तान्हा पोळा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेला गालबोट लागू नये यासाठी भिवापूर पोलिसांनी कडक पवित्रा घेतला आहे. अवैध दारू विक्री, मटका व जुगारासह विविध गुन्ह्यांची नोंद असलेल्या तब्बल ३१ जणांना चार दिवस भिवापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रवेशबंदी करण्यात आली आहे.
ठाणेदार रवींद्र मस्कर यांनी सादर केलेल्या प्रस्तावानंतर उमरेडचे उपविभागीय दंडाधिकारी विद्यासागर चव्हाण यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ (२) अन्वये ८ सप्टेंबर रोजी हा प्रतिबंधात्मक आदेश जारी केला. प्रवेशबंदी केलेल्या ३१ जणांत भिवापूर शहरातील एकूण १६ तर ग्रामीण भागातील वेगवेगळ्या गावच्या १५ जणांचा समावेश आहे.

**९ ते १२ सप्टेंबरदरम्यान 'नो एंट्री'**
आदेशानुसार संबंधित ३१ जणांना ९ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत भिवापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रवेश करता येणार नाही. बैलपोळा व तान्हापोळा उत्सवाच्या काळात या व्यक्तींकडून शांतता भंग होण्याची शक्यता असल्याचे पोलिसांच्या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे.

## सिमेंटकरण सुरू असलेल्या रामटेक-चाचेर-मौदा रस्त्याची ग्रामपंचायत चाचेरतर्फे पाहणी

### एक महिन्यापासून बंद असलेले रस्ता दुतर्फा नालीचे अर्धवट बांधकाम तातडीने सुरू करण्याचे कंत्राटदार अभि इंटरप्राईजेसच्या अधिकाऱ्यांना निर्देश



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**
चाचेर येथे सुरू असलेल्या प्रजिमा-२३ (रा.मा.क्र. ३३१) रामटेक- चाचेर- मौदा या मुख्य रस्त्याच्या कामाची ग्रामपंचायत चाचेर तर्फे सोमवार (ता. ७ सप्टेंबर) ला प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.
सदर काम अभी एंटरप्राईजेसच्या माध्यमातून सुरू असून, चाचेर हे ७ हजार पेक्षा जास्त लोकसंख्येचे मोठे गाव असून मुख्य रस्ता गावाच्या मध्यातून जातो. पावसाचे पाणी व सांडपाणी वाहून नेण्यासाठी दोन्ही बाजूला नालीचे काम हाती घेण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्ष पाहणीत गंभीर बाबी निदर्शनास आल्यास काम गेल्या १ महिन्यापासून पूर्णपणे बंद आहे. अर्धवट खोदलेल्या ड्रेनेजमध्ये ८ ते १० फूट पाणी साचून आहे. यामुळे आजूबाजूच्या दुकानदार, व्यावसायिक आणि येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास होत आहे.पाणी साचलेल्या खड्डयामुळे लहान मुलांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. कोणतीही दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.
या गंभीर परिस्थितीची दखल घेत आज संबंधित एजन्सीचे अधिकारी सोलंकी व त्रिपाठीजी यांच्यासोबत सविस्तर चर्चा करून तात्काळ नाली बांधकाम पूर्ण करण्याचे



निर्देश देण्यात आले.
या पाहणी दौऱ्याप्रसंगी सरपंच लुंबिनी महेश कलारे, यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य शैलेश कोपरकर, प्रकाश वाकलपुडी, सुरेंद्र टेम्भरे, योगेश निनावे, चंद्रकला धोटे, सुमन सोमकुवर, ममता चौरे तसेच विनोद कोपरकर, बाळाभाऊ खंडाईत, नरेश बादोले, पापा शेख, महेश महादुले, शाकीर शेख, महेश सोनवणे, प्रकाश गुंडम, गज्जू दोडके, मल्लू गडे, विठूजी बरबटे व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.
उल्लेखनीय बाब २७ जुन रोजीच ग्रामपंचायत चाचेरने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे लेखी पत्र देऊन चाचेर गावाच्या हद्दीत सर्विस रोड, ब्रेकर, गट्टू, मदन बरबटे यांच्या कॉम्प्लेक्सजवळ पूल बांधकाम, सी.डी. वर्क व हाईमास्ट लाईट (१२ मी.) बसविण्याची अधिकृत मागणी केली होती. त्याचाच पाठपुरावा सदर पाहणी करण्यात आली, हे विशेष !

# ओबीसींच्या विविध मागण्यांवर नागपुरात चर्चा

## स्वतंत्र ओबीसी मंत्रालय, जनगणनेत स्वतंत्र कॉलम, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २७ टक्के आरक्षणासह केंद्राच्या यादीतील प्रलंबित समावेशाचा मुद्दा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
ओबीसी समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांवर नागपूर येथील राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग सदस्य किरण महल्ले, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, सावनेर विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ. आशिष देशमुख आणि राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांच्यात ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

ओबीसी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय हक्कांशी संबंधित अनेक प्रलंबित प्रश्न यावेळी चर्चेच्या केंद्रस्थानी होते.

जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम ठेवण्यात यावा, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. ओबीसी समाजाची अचूक लोकसंख्या आणि सामाजिक-आर्थिक परिस्थितीची वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध झाल्यास त्याआधारे भविष्यातील धोरणे आणि कल्याणकारी योजना अधिक प्रभावीपणे आखता येतील, असा मुद्दा बैठकीत मांडण्यात आला.

ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारच्या पातळीवर स्वतंत्र ओबीसी मंत्रालय सुरू करण्यात यावे, अशी मागणीही बैठकीत करण्यात आली. या माध्यमातून ओबीसी समाजासाठी शिक्षण, रोजगार, कौशल्य विकास, आर्थिक सक्षमीकरण, उद्योजकता तसेच सामाजिक कल्याणाच्या स्वतंत्र योजना राबविण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

त्याचबरोबर क्रिमिलेअरची विद्यमान आर्थिक मर्यादा वाढविण्याची मागणीही चर्चेत मांडण्यात आली. बदलती आर्थिक परिस्थिती, महागाई आणि उत्पन्नातील वाढ लक्षात घेऊन क्रिमिलेअरची मयार्दा वास्तव परिस्थितीशी सुसंगत करण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

ओबीसींच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्नही बैठकीत ऐरणीवर आला. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींना २७ टक्के आरक्षण मिळण्यासाठी भारतीय संविधानातील अनुच्छेद 243D आणि 243T मधील संबंधित तरतुदींमध्ये आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद तसेच नगरपालिका आणि महानगरपालिका यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रभावी राजकीय प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे केंद्रीय ओबीसी यादीत समाविष्ट करण्यासाठी ज्या जातींची शिफारस केली आहे, त्या जातींचा केंद्राच्या यादीत लवकरात लवकर समावेश करण्यात यावा, अशी महत्त्वाची मागणीही यावेळी करण्यात आली.राज्य शासनाकडून शिफारस झाल्यानंतर संबंधित प्रक्रिया विनाकारण प्रलंबित राहू नये आणि पात्र समाजघटकांना केंद्रीय स्तरावरील ओबीसी आरक्षण व योजनांचा लाभ मिळावा, यासाठी या प्रश्नावर तातडीने कार्यवाही करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

UPSC परीक्षा उत्तीर्ण होऊनही प्रतीक्षेत असलेल्या ओबीसी विद्यार्थ्यांचा प्रश्न बैठकीत विशेषत्वाने चर्चिला गेला. गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या संधी वेळेत मिळाव्यात आणि प्रशासकीय प्रक्रियेमुळे त्यांच्या करिअरवर परिणाम होऊ नये, यासाठी संबंधित पातळीवर आवश्यक पाठपुरावा करण्याबाबत चर्चा झाली.

याशिवाय ओबीसी समाजासाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून नवीन कल्याणकारी योजना सुरू करणे, शैक्षणिक व रोजगाराच्या संधी वाढविणे, आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे आणि विविध प्रलंबित प्रश्नांवर ठोस निर्णय घेणे, या विषयांवरही सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.

ओबीसी समाजाच्या मागण्या केवळ आरक्षणापुरत्या मर्यादित नसून जनगणना, शिक्षण, रोजगार, आर्थिक विकास, कल्याणकारी योजना आणि राजकीय प्रतिनिधित्व या सर्वच क्षेत्रांशी संबंधित आहेत. त्यामुळे या मागण्यांवर केंद्र व राज्य सरकारने गांभीयार्ने विचार करून ठोस निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा बैठकीत व्यक्त करण्यात आली.

या बैठकीतून ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांना एकत्रितपणे पुढे नेण्यासाठी आणि संबंधित पातळीवर प्रभावी पाठपुरावा करण्यासाठी महत्त्वाची दिशा निश्चित झाल्याचे मानले जात आहे.

थोडक्यात

## सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षा साहित्याचे वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
प्रभाग क्रमांक १३ च्या नगरसेविका दिव्या तिरपुडे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त वाडी नगर परिषदेच्या सफाई कर्मचाऱ्यांना गमबूट, हँड ग्लोव्हज व भेटवस्तूंचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली. डॉ. आंबेडकर नगर, सम्राट अशोक चौक येथील बौद्ध विहारात झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात सफाई कर्मचारी प्रमुख सुधाकर कोवार यांच्यासह कर्मचाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी नगरसेविका दिव्या तिरपुडे यांच्या हस्ते सुरक्षा साहित्याचे वाटप करण्यात आले. सफाई कर्मचारी धोकादायक ठिकाणी काम करताना साप, विंचू व अन्य किटकांचा सामना करतात. त्यांच्या सुरक्षिततेसाठी राबविलेल्या या उपक्रमाचे कर्मचाऱ्यांनी कौतुक करत नगरसेविका तिरपुडे यांचे आभार मानले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते गौतम तिरपुडे, आकाश तिरपुडे, अमोल तिरपुडे, सुदेश तिरपुडे यांच्यासह महिला मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## तान्हा पोळ्याला महागाईची साज

### लाकडी नंदीबैलाच्या किंमतीत वीस टक्के वाढ, बाजारात विविधरंगी लाकडी बैल विक्रीला



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक (हर्ष कनोजे)**
विदर्भात मोठ्या उत्साहात बैलपोळ्याच सण साजरा केला जातो. या सणाच्या दुसऱ्या दिवशी बालगोपालांचा तान्हा पोळा भरतो. या नंदी पोळ्यासाठी लाकडी बैल शहरातील बाजारपेठेत विक्रीला उपलब्ध झाले आहेत. मात्र, मागील वर्षीप्रमाणे यंदाही लाकडी नंदीबैलाचा किंमतीत वाढ दिसून येत आहे. बाजारात विविधरंगी विविध आकाराच्या बैलांच्या किंमतीत २० टक्क्यांची वाढ दिसून येत आहे. त्यामुळे तान्हा पोळ्यालाही महागाईची झालर दिसून येत आहे. शेतकऱ्यांसाठी महत्वाचा असलेला सण म्हणजे बैलपोळा. हा सण आज साजरा केला जाणार आहे. पोळ्याच्या सणाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची लगबग पहायला मिळत आहे. पोळ्यासाठी बाजारपेठ रंगीबेरंगी साहित्यांनी सजली आहे. बैल पोळ्यानंतर दुसऱ्या दिवशी शुक्रवार (दि. ११ ) बालगोपालांच्या तान्हा पोळा म्हणजेच नंदी पोळा भरतो. या पार्श्वभूमीवर रामटेक शहरात नदी पोळ्यासाठी लाकडी बैल विक्रीला उपलब्ध झाले आहे. लाकडी नंदी बैलाच्या किंमतीत यावर्षी २० टक्के वाढ झाली आहे. बाजारात सर्वात छोटा लाकडी बैल २०० रुपयांपासून ते एक फुटापर्यंतचे बैल ८ हजारांपर्यंत विक्रीला आहे. लाकूड मिळत नसल्याचा परिणाम किंमतीवर झाल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे.

सजावटीच्या साहित्यांच्या किंमतीतही वाढ; तान्हा पोळ्याच्या दिवशी लहान मुलांमध्ये बैलांना सजविण्याची देखील स्पर्धा असते. ही सजावट विविधरंगी झालर, गळ्या छोट्या-मोठ्या घंट्या, खरड्याचा मुकूट, त्यावर मणी अशा स्वरूपाची असते. एका छोट्या अर्ध्या फूट उंचीच्या बैलाला सजविण्याचा खर्च २०० ते ६०० रुपयांच्या घरात आहे. यामुळे सजावट साहित्यांच्या किंमतीतील ही वाढ पालकांवर आर्थिक बोजा टाकणारी ठरत आहे.

### ३५ हजारांचा बैल वेधतोय लक्ष

विदर्भासह नागपूर जिल्ह्यात तान्हा पोळा उत्साहात साजरा केला जातो. बालगोपाल तर या उत्सवाची मोठ्या आतुरतेने प्रतीक्षा करीत असतात. या पार्श्वभूमीवर रामटेक शहरात लाकडी नंदी बैल विक्रीला आले आहे. दरम्यान, जवळपास ४ फूट असलेल्या लाकडी नंदीबैल बालगोपालासह पालकांचेही विशेष लक्ष वेधत आहे. या बैलाची किंमत ३५ हजारांवर असल्याने लाकडी बैलाची किंमत ऐकून नागरिक तोंडात बोटे घालीत आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही रामटेकच्या बाजारात लाकडी नंदी बैल विक्रीला आणले आहे. मागील वर्षीप्रमाणे यंदाही बैलांच्या किंमतीत अल्पशी वाढ आहे. लाकडांची कमतरता तसेच रंगरंगोटीच्या साहित्यांच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे नंदी बैलांच्या दरात किंचित वाढ केली आहे. आपल्याकडे २ हजारांपासून ३५ हजारांपर्यंतचे बैल विक्रीला उपलब्ध आहे. अवघ्या काही दिवसांवर असलेल्या तान्हा पोळा असल्याने ग्राहकांची गर्दी वाढण्याची अपेक्षा आहे.

**- शंकर नागपूरे, कारपेंटर-विक्रेता रामटेक**

## देखभाल दुरुस्तीच्या कामांमुळे आज वीज पुरवठा तात्पुरता खंडित

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
वीज वितरण यंत्रणेच्या नियमित देखभाल व दुरुस्तीसाठी महावितरणतर्फे.बुधवार, दि. ९ रोजी शहरातील काही भागातील वीज पुरवठा तात्पुरता खंडित करण्यात येणार आहे. या वीज बंद सुचनेची नागरिकांनी दखल हेत महावितरणला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या कामांमुळे सिव्हील लाईन्स विभागात सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत एएमडी, सीएसआयआर, या उच्चदाब ग्राहकांसह गजानन महाराज मंदिर, सी पीडब्लूडी कॉलनी, बंगला क्रमांक १७ व १८ आणि धोबी घाट या परिसरातील वीज पुरवठा बंद राहील.महाल विभागात सकाळी १० ते ११ या वेळेत फॉर्च्युन श्री अपार्टमेंट, जयंती मॅन्शन, वैद्य कॉन्व्हेंट, आरटीओ सोसायटी, जीवन अक्षय सोसायटी, पायल पल्लवी सोसायटी, पंचतारा सोसायटी, जय दुर्गा क्र.३, रेल्वे क्रॉसिंग रोड, गजानन शाळा, दिपक कापसे परिसर, केदारे हॉस्पिटल, जंबुदीप नगर, आदिवासी नगर, अंबिका नगर, उदय नगर, हनुमान मंदिर, ओक अपार्टमेंट, उदय नगर चौक परिसर, चंद्रभागा डेली लाईन या भागातील वीज पुरवठा बंद राहील. कॉंग्रेसनगर विभागात सकाळी ८ ते ११ या वेळेत शंकरनगर उपविभागातील वीज पुरवठा बंद राहील

## मेडिकल कॉलेजमध्ये रुग्ण व नातेवाईकांच्या गैरसोयींबाबत अधिष्ठाता यांना निवेदन

### वॉर्डबॉय व प्रशासनाकडून मिळणाऱ्या सेवेत सुधारणा करण्याची राष्ट्रवादी कॉंग्रेस सेवादलाची मागणी




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. रुग्णालयातील वॉर्डबॉय तसेच संबंधित प्रशासनाकडून मिळणाऱ्या सेवेत आवश्यक सुधारणा करून रुग्णांना योग्य सहकार्य मिळावे, या मागणीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सेवादल, नागपूर शहरच्या वतीने मेडिकल कॉलेजचे डीन डॉ. राज गजभिये यांना निवेदन देण्यात आले.

योगेश ज्ञानेश्वर धोटे पाटील यांच्या आयोजनात आणि नागपूर शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे उपाध्यक्ष संतोष भुजाडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने डॉ. राज गजभिये यांची भेट घेतली. यावेळी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या डीन यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या.

यावेळी नागपूर शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे पदाधिकारी आशिष खुबळकर, भारत ठाकरे, तुषार ढबाळे, मनोज जरेल, गोविंदराव सोमकुवर यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रुग्णालय प्रशासनाने निवेदनातील मुद्द्यांची गांभीर्याने दखल घेऊन रुग्णसेवा अधिक प्रभावी, पारदर्शक आणि रुग्णाभिमुख करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सेवादलाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

## खापरखेडा वीज केंद्रातील खाजगी कंपनीच्या गोदामात चोरी

### दोन लाख ३६ हजार रुपयांचे तांब्याचे साहित्य चोरी, दोन आरोपीना अटक

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
स्थानिक औष्णिक वीज केंद्रात असलेल्या एका खाजगी कंपनीच्या गोदामाचे टिनाचे छत कापून अज्ञात चोरट्याने सुमारे २ लाख ३६ हजार रुपये किमतीचे तांब्याचे साहित्य लांबवल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे याप्रकरणी खापरखेडा पोलिसानी दोन चोरट्यांना ७ सप्टेंबरला रात्री उशिरा ताब्यात घेऊन अटक केली असून खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुनीत राजू भगत वय २५, श्रीकांत बंडू गजभिये वय २५ दोघेही रा.जयभोले नगर खापरखेडा अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार इस्जेक हेवी इंजिनिअर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात फ्ल्यू गॅस डिसल्फ्यूराझेशन प्रकल्पाचे कोठ्यावधी रुपयांचे काम मिळाले आहे सद्या सदर कंपनीचे इरेक्शन व कमिशनिंगचे सुरू आहे.

सदर कंपनीला लागणारे साहित्य ठेवण्याकरिता वीज केंद्र युनिट क्रमांक ३ व ४ परिसरात गोदाम बनविण्यात आले आहे १२ ऑगस्ट रोजी इस्जेक हेवी इंजिनिअर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे वरिष्ठ अभियंता सुरज ठाकूर वय ३२, रा. बोकारा, नागपूर व साईड इंचार्ज दीपक मंडल महाजेनकोला देण्यासाठी कॉपर वायर व प्लेट्स काढण्यास गोदामात गेले असता त्यांना गोदामाचे छताचे टिन कापलेले आढळून आहे. गोदामातील साहित्याची पाहणी केली असता १६ एम.एम. कॉपर वायर ३२० मीटर अंदाजे किंमत ९० हजार रुपये, कॉपर प्लेट्स १४ नग अंदाजे १ लाख ३० तीस हजार रुपये कॉपर बॉल ८ नग अंदाजे किंमत १६ हजार रुपये असा एकूण २ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. सदर घटनेत विशेष म्हणजे जवळपास एका महिन्यानंतर ७ सप्टेंबर सोमवारला वरिष्ठ अभियंता सुरज ठाकूर यांनी खापरखेडा पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली लाखो रुपयांचे साहित्य लंपास झाले मात्र एका महिन्यानंतर पोलिसात तक्रार झाल्या मूळे कुठंतरी पाणी मुरत असल्याचे दिसून येते. खापरखेडा पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी पुनीत भगत, श्रीकांत गजभिये याला ताब्यात घेऊन अटक केली असून त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. सदरची कार्यवाही वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सचिन यादव, पोहवा संदीप सगने, बादल गिरी, आशिष मेश्राम,व शेखर वानखेडे, आशिष कापसे पथकाने पार पडली असून पुढील तपास सुरू आहे.

## बांधिलकी प्रतिष्ठानतर्फे शिक्षक दिन विशेष कविसंमेलन उत्साहात संपन्न

### राहुल गवस यांच्या कवितेला श्रोत्यांची भरभरून दाद



**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**
शिक्षक दिनाचे औचित्य साधून बांधिलकी प्रतिष्ठान, अमरावतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेले शिक्षक दिन विशेष ऑनलाइन कविसंमेलन काल, ५ सप्टेंबर रोजी Google Meet च्या माध्यमातून उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. रात्री ठीक ८ वाजता सुरू झालेल्या या कविसंमेलनाची सांगता रात्री १०.३० वाजता झाली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. मंदा नांदूरकर होत्या. संत गाडगेबाबा विद्यापिठ अमरावती च्या मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. मोनाताई चिमोटे यांच्या हस्ते कविसंमेलनाचे उद्घाटन झाले. स्वागताध्यक्ष म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक रविंद्र जवादे उपस्थित होते.

प्रमुख अतिथी म्हणून प्रा. प्रवीण गुल्हाने, प्राचार्या शारदा गणोरकर, प्रा. पद्मिनी दुरुखकर, प्रा. स्मिता शहाणे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बांधिलकी प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा नीता प्रफुल्ल कचवे यांनी केले, तर सूत्रसंचालन सुप्रसिद्ध कवी हितेश गोमासे (नागपूर) यांनी प्रभावीपणे केले.

कविसंमेलनात योगिता निपाणे,स्वाती सेलोकर,रसिका पानके,मंगला नागे, हितेश गोमासे,प्रणाली चव्हाटे, राणी नागापुरे, राहुल गवस, मयूरी ठाकरे, प्रा. रोशनी गतकणे, शालीनी बोरखेडे या निमंत्रित कवींनी आपल्या कविता सादर करून कार्यक्रमात रंगत आणली. तसेच सुप्रसिद्ध साहित्यिक शिक्षिका डॉ. शोभाताई गायकवाड आणि सुप्रसिद्ध साहित्यिक प्रफुल्ल ठाकरे यांनीही कविता सादर केल्या. सुप्रसिद्ध कवी राहुल गवस यांच्या कवितेला रसिक श्रोत्यांनी भरभरून दाद दिली.

रात्री १०.३० वाजता डॉ. सिम्रेला देशमुख यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची यशस्वी सांगता केली. शिक्षक हा केवळ ज्ञान देत नाही, तर तो आयुष्य घडवतो या भावनेतून आयोजित करण्यात आलेले हे शिक्षक दिन विशेष ऑनलाइन कविसंमेलन संस्मरणीय ठरले.

## गट विकास अधिकारी बनले शिक्षक, विद्यार्थ्यांना दिले शिक्षणाचे धडे!

### अंबाडा आदर्श शाळेला अचानक भेट, विद्यार्थ्यांचा शिकवणी वर्ग घेत गुणवत्ता तपासली, शैक्षणिक गुणवत्तेसह भौतिक सुविधांचे कौतुक, शाळेच्या विकासासाठी सहकार्याचे आश्वासन



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
पंचायत समिती नरखेडचे गट विकास अधिकारी अक्षय भगत यांनी मंगळवारी (८ सप्टेंबर) जिल्हा परिषद आदर्श उच्च प्राथमिक शाळा अंबाडा (सा.) येथे अचानक भेट देत विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. विशेष म्हणजे, अधिकारी म्हणून शाळेची पाहणी करण्याबरोबरच त्यांनी चक्क शिक्षकाची भूमिका बजावत विद्यार्थ्यांचा शिकवणी वर्ग घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

गट विकास अधिकारी अक्षय भगत यांनी विद्यार्थ्यांशी विविध विषयांवर संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांना अभ्यासातील अडचणी, आवडते विषय, भविष्यातील ध्येय तसेच शाळेत उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सुविधांबाबत त्यांनी प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे प्रश्नांची उत्तरे देत संवादात सहभाग घेतला.

यानंतर भगत यांनी विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष शिकवणी वर्ग घेत अभ्यासाची योग्य पद्धत, वेळेचे नियोजन, नियमित वाचन आणि सातत्यपूर्ण मेहनतीचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनीही त्यांच्याकडून मिळालेल्या मार्गदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांची गुणवत्ता व विषयाचे आकलन पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

शाळेतील विद्यार्थी पटसंख्या, शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त, स्वच्छता आणि उपलब्ध भौतिक सुविधा यांची पाहणी करून त्यांनी मुख्याध्यापक व शिक्षकांचे कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दजेर्दार शिक्षण मिळावे, यासाठी शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीचे त्यांनी विशेष कौतुक केले.

शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. शाळेला भविष्यात कोणत्याही प्रकारची कमतरता भासू देणार नाही, असे आश्वासनही गट विकास अधिकारी अक्षय भगत यांनी यावेळी दिले. विद्यार्थ्यांची चांगली पटसंख्या आणि शाळेतील सकारात्मक शैक्षणिक वातावरण पाहून समाधान वाटत असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिकाऱ्यांच्या या अनपेक्षित भेटीमुळे विद्यार्थ्यांसह शिक्षकांमध्येही उत्साह निर्माण झाला. केवळ प्रशासकीय पाहणी न करता विद्यार्थ्यांच्या वर्गात जाऊन त्यांच्याशी थेट संवाद साधण्याच्या त्यांच्या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, मुख्याध्यापक सचिन पवार, पल्लवी घडेकर, योगेश विरखडे, जया फोफसे, रेखा पटोरकर तसेच शाळेतील शिक्षक उपस्थित होते.

थोडक्यात

## समृद्ध पारंपरिक संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि हा अमूल्य सांस्कृतिक वारसा गरज

### 'मन लोवडी दरारे वीर, आज म चाली रे'च्या तालावर थिरकल्या महिला



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

बंजारा समाजाच्या समृद्ध पारंपरिक संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि हा अमूल्य सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने रामटेक येथे रविवारी बंजारा तीज महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या महोत्सवात 'मन लोवडी दरारे वीर, आज म चाली रे' या लोकप्रिय बंजारा गीतावर महिला व पुरुषांनी पारंपरिक नृत्य सादर करत उत्सवाचा मनसोक्त आनंद लुटला. डफड्याच्या साथीने आणि ठेक्यावर तांड्यात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.व सेवानिवृत्ती निमित्त सुभाष चव्हाण व उदल राठोड यांच्या सत्कार करण्यात आले. गुणवंत विद्यार्थी अदिती जाधव माही जाधव तसेच विजय राठोड जोत्सना राठोड, तुषार चव्हान चा शासकीय सेवेत नियुक्ती म्हणून सत्कार करण्यात आले. यंदाचा हा उत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी नायक सुंदरसिंग राठोड, कारभारी सुनिल पवार गोपाल राठोड, दिनेश आडे, सचिन चव्हाण, नरेश राठोड, आदीनी विशेष परिश्रम घेतले.

तीज महोत्सवाचे धार्मिक धार्मिक वसांस्कृतिक महत्त्वः बंजारा समाजात तीज' अर्थात 'जवारा' हा सण पवित्र मानला जातो. जन्माष्टमीच्या सुमारे दहा दिवस आधी घरोघरी मुलींच्या नावाने तीज (गौरी) स्थापन केली जाते. विसर्जनाच्या पूर्वसंध्येला 'ढबोळी' ची पारंपरिक विधी पार पडते. त्यानंतर तांड्यातील मुख्य (नायक) यांच्या घरी सर्व समाजबांधव एकत्र येतात. यावेळी बोरीच्या झाडाची विधिवत पूजा केली जाते. नायकांच्या माध्यमातून मुलींचा विशेष सन्मान करून त्यांना भेटवस्तू दिल्या जातात. तीजची मिरवणूक काढून राखी तलाव जवारांचे विसर्जन करण्यात येते.

### निसर्गपूजा आणि स्त्रीसन्मानाचा संदेश

या पारंपरिक उत्सवातून निसर्गाप्रती प्रभावीपणे दिला जातो. बोरीच्या झाडाची पूजा करून निसर्गाशी जुळलेले घट्ट नाते बंजारा समाजाने आजही कायम ठेवले आहे. मुलीच्या सन्मानाला प्राधान्य देणाऱ्या या संस्कृतीतून 'बेटी बचाओ' चा संदेश अनेक दशकांपासून दिला जात असल्याची भावना यावेळी उपस्थितमान्यवरांनी व्यक्त केली. तुमसर परिसरात मागील अनेक वर्षांपासून बंजारा समाजबांधवांकडून या सांस्कृतिक वारशाचे सातत्याने जतन केले जात आहे. रामटेक व परिसरातील बंजारा समाजातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने या महोत्सवात सहभागी झाले होते. पारंपरिक गीते, फेर धरून केलेले नृत्य आणि विविध धार्मिक विधींमुळे या तीज उत्सवाला एक विशेष रंगत व कृतज्ञता आणि स्त्रीसन्मानाचा संदेश चैतन्य प्राप्त झाले होते.

## सुनील हत्तीमारे यांची किसान काँग्रेस कमिटीच्या तालुकाध्यक्षपदी नियुक्ती

### शेतकरी व ग्रामीण प्रश्नांना प्राधान्य देत संघटन मजबूत करण्याचा निर्धार

**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

बोदलबोडी येथील सामाजिक कार्यकर्ते व शेतकरी हितासाठी सातत्याने कार्यरत असलेले श्री. सुनील एम. हत्तीमारे (सावकार)



यांची किसान काँग्रेस कमिटी, सालेकसा तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे सालेकसा तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुनील हत्तीमारे हे ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी व सर्वसामान्यांच्या विविध प्रश्नांशी सातत्याने जोडलेले असून, शेतकऱ्यांच्या अडचणी शासन दरबारी मांडण्यासाठी तसेच त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहिले आहेत. त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल घेत त्यांच्यावर किसान काँग्रेस कमिटीच्या तालुकाध्यक्षपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, कृषी मालाला योग्य भाव, शेतीसाठी आवश्यक सुविधा, सिंचन व्यवस्था, पीक नुकसान, कृषी विभागाच्या योजना तसेच ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्न यासाठी किसान काँग्रेसच्या माध्यमातून प्रभावीपणे आवाज उठविण्याचा निर्धार सुनील हत्तीमारे यांनी व्यक्त केला.

शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहणे ही काळाची गरज आहे. सालेकसा तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या अडचणी समजून घेऊन त्या शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणार, असा विश्वास नवनियुक्त तालुकाध्यक्ष सुनील हत्तीमारे यांनी व्यक्त केला. त्यांच्या नियुक्तीबद्दल काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, किसान काँग्रेसचे सदस्य तसेच बोदलबोडी व सालेकसा तालुक्यातील नागरिकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## धरमपेठ झोन अंतर्गत अनधिकृत रस्ता फुटपाथवरील अनधिकृतपणे लावण्यात आलेले दुकानांवर कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिका, धरमपेठ झोन क्र.०२, अंतर्गत अतिक्रमण कारवाई आमदार निवास, सिव्हील लाईन्स, तेलंगखेडी, आरटीओ रोड, व्हीयंआईटी, यशवंत स्टेडियम येथे धरमपेठ झोन अंतर्गत रस्ता फुटपाथवरील अनधिकृतपणे लावण्यात आलेले दुकांनांवर कारवाई करण्यात आली. सदर कारवाई आयुक्त मनपा नागपूर, पोलीस आयुक्त नागपूर शहर, उपायुक्त वाहतुक, नागपूर यांच्या संयुक्तिक मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अतिक्रमण निर्मुलन कारवाई मधे धरमपेठ झोन चे सहाय्यक आयुक्त, अतिक्रमण पथक धरमपेठ झोन, एन.डी.एस अधिकारी व कर्मचारी संपूर्ण कार्यवाही मध्ये उपस्थित होते.





# अभिनेते गोविंदा यांनी जामसावळी धाम येथे घेतले श्री हनुमानाचे दर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, जामसावली :** सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेते श्री. गोविंदा यांनी मंगळवारी प्रसिद्ध धार्मिक आणि श्रद्धास्थान असलेल्या चमत्कारिक श्री हनुमान लोक, जामसावळी धाम येथे भेट देऊन श्री हनुमानाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी विधिवत पूजा-अर्चना करून श्री हनुमानाचा आशीर्वाद घेतला. जामसावळी धाम येथे आगमन झाल्यानंतर मंदिर संस्थानच्या वतीने श्री. गोविंदा यांचे आत्मीय स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना श्री हनुमानाची मूर्ती भेट देऊन सन्मानित करण्यात आले. श्री. गोविंदा यांच्या आगमनाची माहिती मिळताच मोठ्या संख्येने भाविक जामसावळी धाम येथे दाखल झाले. संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. श्री. गोविंदा यांची एक झलक पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. पूजा-अर्चनेदरम्यान श्री. गोविंदा यांनी जामसावळी धामच्या धार्मिक आणि आध्यात्मिक वैशिष्ट्यांची माहितीही घेतली. श्री हनुमानाप्रती आपली श्रद्धा व्यक्त करत त्यांनी धाममधील आध्यात्मिक ऊर्जा आणि भक्तिमय वातावरणाचे कौतुक केले.

## सावनेर विधानसभा मतदार संघ मतदात्यांना निवेदन

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर : दिनांकः ८/९/२०२६ रोजी दुपारी १२ वाजता विशेष सखोल पुनरिक्षण २०२६ च्या अनुषंगाने मतदार नोंदणी अधिकारी ४९ सावनेर विधानसभा मतदार संघ तथा उपविभागीय अधिकारी, सावनेर यांचे कार्यालयात सर्व संपादक, पत्रकार, वृत्तपत्र प्रतिनिधी,




इत्यादी यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. सदर पत्रकार परिषदेत दिनांकः ३१-८-२०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रत्येक मतदान केंद्रांवर प्रसिध्द करण्यात आली. सर्व मतदारांना आवाहन करण्यात येते की, मतदारांनी आपल्या क्षेत्रातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना भेटून आपले नाव सदर प्रारूप मतदार यादीत असल्याबाबतची खात्री करून घ्यावी. तसेच प्रसिध्द केलेल्या प्रारूप मतदार यादीत ज्या मतदारांची नावे No Mapping U Logical Discrepancies या प्रवर्गात आलेली आहेत अशा मतदारांना सुनावणी करिता नोटीस जारी करण्यात येणारे आहेत. सदर सुनावणीची नोटीस प्राप्त होताच संबंधित मतदार यांनी मा.भारत निवडणूक आयोग नेमून दिलेल्या विहित पुराव्यांसह सुनावणी नियोजित केलेल्या दिनांकास व वेळेस हजर राहणे आवश्यक आहे. तसेच ज्या नवमतदारांचे वय दिनांकः १-१०-२०२६ रोजी १८ वर्ष पूर्ण होत आहे अशा नवमतदारांनी नमुना ६ अर्ज मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्र व पुराव्यांसह भरून द्यावा. विशेष सखोल पुनरिक्षण २०२६ ची प्रक्रिया सुरू होण्यापुर्वी ४९ सावनेर विधानसभा मतदार संघात मतदारांची संख्या ही ३२९४६८ इतकी होती तसेच प्रारूप मतदार यादी प्रसिध्दीनंतर मतदारांची संख्या ही २४९०४० इतकी असून वगळण्यात आलेल्या मतदारांची संख्या ८०४२८ एवढी आहे. पत्रपरिषदेला कल्याणकुमार डहाट, मतदार नोंदणी अधिकारी, ४९ सावनेर विधानसभा मतदार संघ तथा उपविभागीय अधिकारी, सावनेर, अक्षय पोयाम तहसीलदार सावनेर,विकास भक्कड तहसीलदार कळमेश्वर प्रामुख्याने उपस्थित होते.

## नागपूर दक्षिण-पश्चिम मतदारसंघात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम

### अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबरला प्रसिद्ध

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार ५२-नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ राबवण्यात येत असून, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील सर्व



मतदारांनी मतदार यादीत आपले नाव तपासून घ्यावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सचिन कुमावत यांनी केले आहे. ज्या नागरिकांची नावे मतदार यादीत आढळलेली नाहीत, त्यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयात किंवा voters.eci.gov.in या संकेतस्थळावर तसेच 'Voter Helpline App' द्वारे ऑनलाईन नमुना क्र. ६ भरून नाव नोंदणी करावी. याशिवाय, नागरिकांच्या सोयीसाठी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे विशेष नोंदणी मोहीम राबवली जात आहे. याअंतर्गत १९ व २० सप्टेंबर तसेच २६ व २७ सप्टेंबर रोजी शनिवार आणि रविवारी जवळच्या मतदान केंद्रांवर मतदान केंद्रस्तरीय अधिकारीउपस्थित राहणार असून, नागरिकांना तेथे प्रत्यक्ष जाऊनही नमुना क्र. ६ भरता येईल.

घरोघरी सर्वेक्षणादरम्यान न आढळलेले, स्थलांतरित किंवा मृत मतदारांच्या याद्या आणि प्रारूप मतदार यादी नागपूर महानगरपालिकेच्या लक्ष्मीनगर, धंतोली, धरमपेठ व हनुमान नगर झोन कार्यालयात, स्थानिक 'बीएलओ'कडे तसेच प्रमुख राजकीय पक्षांकडे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या यादीत नाव असलेल्या परंतु संबंधित भागातच राहणाऱ्या मतदारांनी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत नमुना क्र. ६ भरून नोंदणी करणे आवश्यक आहे. ज्या मतदारांचे जुने अभिलेख जुळलेले नाहीत किंवा ज्यांच्या माहितीत विसंगती आढळली आहे, अशा मतदारांची सुनावणी ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांमार्फत घेतली जाईल. आवश्यक कागदपत्रे सादर करून त्रुटींची पूर्तता करणाऱ्या मतदारांचा अंतिम मतदार यादीत समावेश केला जाईल, आणि अखेर सर्व प्रक्रिया पूर्ण करून ०४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

## पारशिवनी तालुक्यातील ५० ग्रामपंचायतींचे सरपंच आरक्षण जाहीर, २६ जागा महिलांसाठी राखीव

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी तालुक्यातील ५० ग्रामपंचायतींच्या सन २०२५-३० या कालावधीसाठी सरपंच पदाचे आरक्षण सोडत सोमवार, ७ सप्टेंबर रोजी तहसील कार्यालय, पारशिवनी येथे तहसीलदार सुरेश वाघचौरे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर करण्यात आली. यावेळी तालुक्यातील विविध ग्रामपंचायत सरपंच, सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकूण ५० जागांपैकी २६ जागा महिला प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आल्या असून, अनुसूचित जमाती ७ व अनुसूचित जाती ७ जागांवर आरक्षण निश्चित झाले आहे.

**आरक्षण याप्रमाणे -**

**१) अनुसूचित जमाती - ७ जागा**

ग्रामपंचायत सालई (मा) - अनु. जमाती, कोलीतमारा - अनु. जमाती, बनपुरी - अनु. जमाती, ढवळापूर - अनु. जमाती महिला, सुवरधरा - अनु. जमाती महिला, पालासावळी - अनु. जमाती महिला, दहेगाव (जो) - अनु. जमाती महिला.

**२) अनुसूचित जाती - ७ जागा**

ग्रामपंचायत निंबा - अनु. जाती, गवणा - अनु. जाती, मेहंदी - अनु. जाती, इटगाव - अनु. जाती महिला, पिपळा - अनु. जाती महिला, डोरली - अनु. जाती महिला, घाटरोहना - अनु. जाती महिला.

**३) नागरिकांचा मागास प्रवर्ग - १२ जागा**

सालई (मोकासा) - नामाप्र, पारडी - नामाप्र, जुनि कामठी - नामाप्र, डुमरीकला - नामाप्र, निमखेडा - नामाप्र, बोरी सिंगोरी - नामाप्र, नयाकुंड - नामाप्र महिला, टेकाडी (वन) - नामाप्र महिला, हिंगणा (बारा) - नामाप्र महिला, नांदगाव - नामाप्र महिला, टेकाडी (को.ख) - नामाप्र महिला, निलज - नामाप्र महिला.

**४) सर्वसाधारण प्रवर्ग - २४ जागा**

ग्रामपंचायत आमगाव, भागीमहारी, उमरी (पाली), सावळी, करंभाड, पालोरा, वाघोडा, तामसवाडी, बखारी, गोंडेगाव, बोरडा, खेडी - सर्वसाधारण. बिटोली, माहुली, चारगाव, नवेगाव खैरी, खंडाळा (मरि), गुंढरी (वां), वराडा, आमडी, खंडाळा (डुमरी), साटक, केरडी, खंडाळा (घटाटे) - सर्वसाधारण महिला. या सोडतीमुळे तालुक्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकांचे चित्र स्पष्ट झाले असून इच्छुक उमेदवारांनी तयारी सुरू केली आहे.

## ऑफ्रोहचे महाराष्ट्रभर धरणे आंदोलन, अनुसूचित जमाती कर्मचाऱ्यांचा सुधारित कायद्याविरोधात संताप

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्रांच्या वैधतेची पुन्हा-पुन्हा तपासणी करून कर्मचाऱ्यांना आयुष्यभर न्यायालयीन लढाईत अडकविणाऱ्या २०२६ च्या सुधारित कायद्याविरोधात ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन (ऑफ्रोह)च्या वतीने सोमवारी महाराष्ट्रभर जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर धरणे व निदर्शने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. आंदोलनादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला विविध सेवाविषयक मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून अनेक जमातींच्या जात प्रमाणपत्रांवर आक्षेप घेत ती अवैध ठरविली जातात. संबंधित कर्मचाऱ्यांना अनेक वर्षे न्यायालयीन लढा द्यावा लागतो. दीर्घ न्यायालयीन



प्रक्रियेनंतर वैधता प्रमाणपत्र मिळाल्यानंतरही त्याची पुन्हा तपासणी करून कर्मचाऱ्यांना कायम न्यायालयीन प्रक्रियेत अडकविण्याचा प्रयत्न शासनाने नव्या कायद्याद्वारे केल्याचा आरोप ऑफ्रोहने केला आहे. २२ जुलै रोजी राजपत्रात प्रसिद्ध झालेला हा सुधारित कायदा रद्द करण्यात यावा, तसेच अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांच्या विविध सेवाविषयक समस्या तातडीने सोडविण्यात याव्यात, अशी प्रमुख मागणी आंदोलन कर्त्यांनी केली.

विधेयकाबाबत शासनाने सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप आदिवासी विकास विभागाचे मंत्री प्रा. अशोक उईके यांनी विधिमंडळ सभागृहात चुकीची माहिती देऊन सदस्यांची दिशाभूल केल्याचा आरोप ऑफ्रोहने केला आहे. विधेयक क्रमांक ६१ वर ९ व १० जुलै रोजी पुरेशी चर्चा न करता ते मंजूर केल्याचा देखावा निर्माण करण्यात आल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

याशिवाय, या कायद्याविरोधात न्यायालयातून स्थगिती मिळू नये यासाठी आदिवासी विकास विभागाने २३ जुलै रोजी कॅव्हेट दाखल केल्याचा आरोपही संघटनेने केला. एखाद्या कायद्याविरोधात न्यायालयीन स्थगिती रोखण्यासाठी शासनाच्या विभागाने कॅव्हेट दाखल करण्याचा हा नवीन पायंडा असल्याचे सांगत यामागे अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची जाणीवपूर्वक कोंडी करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. सेवाखंड व निवृत्तीवेतनाच्या अटी रद्द करण्याची मागणी शासनाने ४ ऑक्टोबर २०२४ रोजी सेवासमाप्त कर्मचाऱ्यांचा सेवाखंड क्षमापित करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, सेवाखंडाचा कालावधी निवृत्तीवेतनासाठी ग्राह्य धरला जात नसल्याने अनेक कर्मचाऱ्यांच्या अर्हताकारी सेवेत घट होत असून त्यांना निवृत्तीवेतनापासून वंचित राहावे लागत असल्याची बाब आंदोलनकर्त्यांनी निदर्शनास आणून दिली. ही अट तत्काळ रद्द करून संबंधित कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनाचा लाभ देण्यात यावा, या मागणीसाठी स्वतंत्र निवेदन देण्यात आले.

आश्वासित प्रगती योजनेबाबतही निर्णयाची अंमलबजावणीची मागणी कर्मचाऱ्यांना १०, २० व ३० वर्षांनंतर देण्यात येणाऱ्या आश्वासित प्रगती योजनेच्या लाभासंदर्भातील अटी चुकीच्या पद्धतीने लावण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला. निर्मला सिद्धराम भंडारी यांच्या प्रकरणात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने स्वतंत्र निवेदनाद्वारे केली. अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष जात प्रमाणपत्र जाणीवपूर्वक अवैध ठरवून अनेक कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्याने त्यांच्या सेवेत अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. याबाबत यापूर्वी शासनाकडे वारंवार निवेदने देऊनही त्याची दखल घेतली जात नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढत असल्याचे ऑफ्रोहने म्हटले आहे. शासन निर्णय काढताना निरनिराळ्या अटी लावून अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची कोंडी केली जात असल्याने शासनाविरोधातील रोष वाढत असल्याचे आंदोलनातून स्पष्ट झाले.

विविध जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर झालेल्या निदर्शनांमध्ये मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी झाले होते. आंदोलना नंतर ऑफ्रोहचे राज्याध्यक्ष राजेश सोनपरोते, राज्य महासचिव डॉ. दीपक केदार, राज्य उपाध्यक्ष प्रा. ॲड. देवराम नंदनवार, सहसचिव डॉ. अनंत पाटील, राज्य कोषाध्यक्ष मनीष पंचगाम, सदस्य अनिल ढोले, मनोज जुनोनकर, गजेंद्र पौनीकर, महिला आघाडीच्या राज्याध्यक्षा अनघा वैद्य तसेच उपाध्यक्षा प्रिया रामटेककर-खापरे यांच्या स्वाक्षरीचे निवेदन जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले. यासोबतच सेवाखंड व आश्वासित प्रगती योजनेसंदर्भात स्वतंत्र निवेदनेही देण्यात आली.

